
सोनाली सामंत
मौनात अर्थ सारे

# मौनात अर्थ सारे

सोनाली सामंत

ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

# मौनात अर्थ सारे (लघुकादंबरी)

लेखिका : सोनाली सामंत

+91(9762547520)

sonali.samant1@gmail.com

सिंधुदुर्ग

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे .तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते .

प्रकाशक

ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

esahity@gmail. com

प्रकाशन :२८ मार्च २०१७ (गुढीपाडवा)

©esahity Pratishthan®2017

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध .
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता .
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ईनगी घेणे साहित्य प्रतिष्ठानची परवा- .आवश्यक आहे

# मनोगत



'मौनात अर्थ सारे' ही माझी पहिलीच लघुकादंबरी.

यापुर्वी कथा लिहिल्या आहेत  परंतु त्या कुठे प्रसिद्ध केल्या नाहीत. "मौनात..." ची कथा खुप दिवसांपासुन डोक्यात घोळत होती. तुकड्यांमध्ये विखुरलेली ही कथा अखेर लिहायला बसल्यावर एकसंध झाली.

असं म्हणतात की एखाद्यावर मनापासुन प्रेम असेल तर ते सफल होतेच. त्यासाठी आयुष्यात बऱ्याच तडजोडीही केल्या जातात. कारण कोणत्याही परिस्थितीत त्या दोघांना एकमेकांशिवाय जगणं शक्य नसतं. याच धाग्याला पकडून ही कथा रचली आहे. आशा करते ही वाचकांना आवडेल आणि प्रार्थना करते की सर्वांच्याच आयुष्यातलं प्रेम यशस्वी होवो!

सोनाली सामंत

ही कादंबरी वाचकांपर्यंत पोचवण्यात मला सहकार्य केल्याबद्दल मी ई साहित्य प्रतिष्ठानचे मनः पूर्वक आभार मानते.

मी महावितरण मध्ये डेप्युटी मॅनेजर म्हणून कार्यरत आहे. माझे जन्मस्थान व कर्मभुमी सिंधुदुर्ग. लेखन हा माझा छंद आहे. लिहायला बसल्यावर इतर सर्व विचार दूर जातात. ती एक नशा वाटते. वेगळ्याच जगात वावरत असल्यासारखं वाटत. काल्पनिक पात्र आपलीशी वाटतात. एखादा चित्रपट पाहत असल्यासारखी कथा समोर ठाकते. मी फ़क्त तिला शब्दरूप देते. सुहास शिरवळकर, नारायण धारप, शोभा राऊत, योगिनी जोगळेकर यांचे साहित्य वाचायला मला खुप आवडते. ही सर्वजण माझी प्रेरणास्थाने आहेत.

हे पुस्तक, ही कथा वाचकांना कशी वाटते ते जाणून घ्यायची खुप उत्सुकता आहे. आपण आपल्या प्रतिक्रिया मला नक्की कळवाल अशी आशा आहे.

धन्यवाद

सोनाली सामंत

फोन नं. ९७६२५४७५२०

sonali.samant1@gmail.com

अर्पणपत्रिका

आयुष्याच्या प्रत्येक वळणावर

माझ्या पाठीशी खंबीरपणे उभ्या असलेल्या

माझ्या मातोश्री सौ शैलजा चंद्रशेखर सामंत

आणि माझी दिदी सौ प्रियांका रुपेश देसाई

यांना अर्पण.

------ सोनाली सामंत

# मौनात अर्थ सारे

अविनाश कुलकर्णी एक अत्यंत हुशार व्यक्तिमत्व. भरपूर उंची, काळे, कुरळे केस आणि या सर्वाला शोभेल असा भावस्पर्शी चेहरा. वडील माधव कुलकर्णी म्हणजे एक बडं प्रस्थ, 'ममता इंडस्ट्रीज' चे मालक. कर्तव्यदक्ष पिता आणि प्रेमळमाता अशा छत्रछायेखाली सुसंस्कारी अविनाशची जडणघडण झाली. त्याच्यातली हुशारी आणि जिद्द बघून वडिलांनी उच्चशिक्षणासाठी त्याला मामाकडे अमेरिकेला पाठविले. अविनाश भारतात आला तोच चेहऱ्यावर उच्चविद्येचे तेज घेऊन. नवनवीन तंत्रज्ञान, मेहनत आणि प्रत्येकाला आपलंसं करण्याची कला या जोरावर त्याने 'ममता इंडस्ट्रीज' ला यशाच्या शिखरावर नेऊन ठेवलं. अशा या सगळ्या आनंदाला दु:खाची एक छटा होती ती म्हणजे अविनाशच्या आयुष्यात कोणी मुलगी नव्हती. त्याला खूप मित्र होते. त्यातले जिवलग म्हणजे सुशांत आणि श्रेयस. अविनाश कॉलेजला असताना त्याच्यासाठी कितीतरी हुशार, सुंदर मुली ताटकळत असायच्या. परंतू त्याने साधी मैत्री एवढीही ओळख वाढवली नाही. परदेशात गेल्यावर तिथल्या संस्कृतीमध्ये भावनांना कमी महत्व असल्याने प्रेम वगैरेचा प्रश्नच आला नाही. आताही लग्नाचं वय झालं असूनही तो त्या बाबतीत विशेष लक्ष देत नसे. बस्स ! या एकाच काळजीने ममता कुलकर्णी यांना ग्रासलं होतं. तर माधवरावांच्या मते ही विशेष चिंतेची बाब नव्हती.

“तुम्हाला आमच्या बायकांचं मन नाही कळणार. अहो इतक्या वर्षात आपल्या अविला एकही मुलगी आवडली नाही? बरं त्याचा प्रेमभंग वगैरे झाला असला तरी तेही नाही. सुशांत आणि श्रेयसला सगळंच माहित आहे. मला वाटतं आपण डॉ. केळकरांशी बोलाव !” इतका वेळ अखंड पणे बोलणाऱ्या ममताजींच्या शेवटच्या वाक्याने माधवरावांची तंद्री भंग पावली. पुस्तकातली नजर काढून त्यांनी ममताजींकडे पाहिलं.” तुम्ही उगाच जीवाला घोर घालून घेतलाय. मी अविला चांगलाच ओळखतो. त्याच्या आवडीनिवडी नक्कीच खूप वेगळ्या आहेत पण उथळ नाहीत. आपला हस्तक्षेप नको.” आणि ते पुनश्च वाचनात गढून गेले. ममताजी तिथून उठल्या आणि देव्हाऱ्यात गेल्या. आज त्यांचं चित्त उदास झालं होतं.

देव्हाऱ्यातल्या बाळकृष्णाला त्यांनी मनोभावे नमस्कार केला आणि म्हणाल्या,” हे मुरलीधरा आजवर तू मला भरभरून दिलंस. तुझ्या कृपेने माझ्याकडे सर्व आहे. आज प्रथमच तुझ्याकडे काहीतरी मागते आहे. प्रभो, माझ्या अवीच्या आयुष्यात जोडीदार येऊ दे. त्याचं सांसारिक आयुष्य फळताना फुलताना मला बघायचं आहे.” ममताजी नतमस्तक झाल्या आणि त्याचवेळी बाळकृष्णाच्या मुर्तीवरचं फुल त्यांच्या डोक्यावर पडलं.

“ आई नाश्ता पटकन बनव मिटिंग आहे महत्त्वाची. माणसं खोळंबली असतील.” अविनाश टाय नीट करत डायनिंग हॉल मध्ये आला.” अरे हो तुझ्या आवडीचा रव्याचा गोड शिरा केला आहे. पिकलेला आंबा घालून. चल वाढते.” ममताजींनी नोकरांना नाश्त्याच्या डिश

भरायला सांगितल्या" आई तू ग्रेट आहेस. शिरा पण मस्तच झालाय. संध्याकाळी लवकर येतो मस्त बाहेर जाऊ." अविनाश म्हणाला.

"वा ! खरंच ये तुझी मावशी केव्हाची बोलावतेय, जाऊन येऊ," ममताजींना बरं वाटलं. होकारार्थी मान हलवत अविनाश उठला. ड्रायव्हरला गाडी काढायला सांगून तो बेसिनकडे वळला.

-------------*-------------

"हॅलो, हा बोला मॅडम. हो माझी पूर्ण तयारी झाली आहे. माझी खात्री आहे हे प्रोजेक्ट आपल्याच कंपनीला मिळेल. थँक्यु मॅडम," अनघाने आत्मविश्वासाने फोन ठेवला. अनघा देशपांडे म्हणजे सगळयांची आवडती अनु. अनघा लहान असतानाच तिची आई देवाघरी गेली. तेव्हापासून एकुलत्या एक अनघाला आई, भाऊ, बहिण सर्वच बाबा बनून गेले. अनघाचे वडील म्हणजे सुधीर देशपांडे हे शाळेत एक कडक शिक्षक म्हणून ओळखले जात. पण मुलीच्या बाबतीत तो एक वात्सल्याने ओतप्रोत भरलेला समुद्र होता. अर्थात अनघासुद्धा कोणाच्याही मनात भरेल अशी होती. लांबसडक काळेभोर केस आणि गालांना पडणाऱ्या खळया यांच्यामुळे ती अधिकच लोभस वाटे. जेवण, कला-कुसर, अशा सगळयात पुढे असणाऱ्या अनघाचा तिचे वडील म्हणजे विक पॉइंट होता. आपल्या वडिलांनी आपल्यासाठी किती खस्ता खाल्ल्या याची तिला जाणीव होती आणि म्हणूनच वडिलांना कधीच एकटं सोडायचं नाही असा तिने निर्धार केला होता. त्यासाठी तिने एक निर्णय घेतलेला, कधीही लग्न न करण्याचा. तिची बालमैत्रीण राधाशिवाय हे कोणालाच माहित नव्हतं.

अनघाने नुकतंच आर्किटेक्चर पूर्ण केलं होतं आणि ती एका मोठ्या कंपनीत नोकरीला लागली होती. तिथेही तिने आपल्या हुशारीवर कंपनीच्या एम. डी. सौ शैलजा साठे यांच्या मनात स्थान निर्माण केलं होतं. म्हणूनच यावेळी शैलाजाताईंनी तिच्यावर मोठी जबाबदारी टाकली होती. 'ममता इंडस्ट्रीज' च्या नव्या प्लांटच्या आर्किटेक्टचा प्रोजेक्ट त्यांच्या कंपनीला मिळवून देण्याचा. आजची मिटिंग अनघासाठी खूप महत्वाची होती. गेले कित्येक दिवस तिने मनापासून तयारी करून प्रोजेक्ट बनवलेला. आजचा पेहराव मात्र तिने साधाच ठेवला. फिकट पिवळया रंगाचा लाल कुर्ता, त्यावर पांढऱ्या रंगाचे नाजूक नक्षीकाम केले होते.

तशीच सलवार होती. केसांची सैलसर वेणी घातली होती. डाव्या हातात घड्याळ आणि उजव्या हातात नाजूक ब्रेसलेट. चेहऱ्यावर पावडरचा हलकासा हात लावत आणि डोळ्यावरची टिकली निट करत तिने एकवार आरशात पाहिले आणि आपली बॅग घेऊन ती वडिलांच्या खोलीत आली.” बाबा, आशिर्वाद द्या. आज खूप महत्त्वाची मिटिंग आहे.”

सुधीररावांच्या पायाला स्पर्श करत अनघा म्हणाली. सुधीररावांनी तिच्या हातावर दहीसाखर ठेवले आणि म्हणाले,” अनु, यशस्वी हो. मला खात्री आहे एवढ्या दिवसांची तुझी मेहनत फळाला येणार. हे प्रोजेक्ट तुलाच मिळणार. बरं जाताना देवाला नमस्कार करून जा.” “ बाबा तुम्हीच माझा देव. तुम्ही आशीर्वाद दिला ना, झालं मग.” असं म्हणत अनघा घराबाहेर पडली.

-------------*-------------

“काय झालं भाऊ? गाडी हळू का चालवता आहात? ” अविनाशने घड्याळाकडे बघत विचारलं.

” मालक नुकताच पाऊस पडलाय त्यामुळे रस्त्यावर खूप पाणी साचलय.”  ड्रायव्हर म्हणाला.

” भाऊ अहो पोचायला हवंय. अजून मोठे चार सिग्नल आहेत. चला पाहू भरभर.” अविनाश नाखुशीने म्हणाला.

अनघा बस स्टॉप वर उभी होती. ती मुद्दामच लवकर निघाली होती. नुकताच पाऊस पडलेला त्यामुळे उगाच बस उशिरा यायची. तेवढ्यात एक अलिशान कार तिच्या समोरून गेली. नेमका खड्डा होता आणि त्यात पाणी साचलेलं ते अनघाच्या अंगावर पडलं. तिचा पूर्ण ड्रेस खराब झाला. अनघाला भयंकर राग आला वेगाने पुढे जाण्याऱ्या गाडीचा नंबर तिने नीट पाहून घेतला.

” कधी तरी भेटशीलच मग दाखवते.”  स्वतःशीच पुटपुटत तिने रिक्षेला हात केला आणि घरचा पत्ता सांगितला.

“काय ग अनु! काही विसरलीस का? ” तिला परत आलेली पाहिल्यावर सुधीरराव काळजीने म्हणाले.

” हो एक महत्वाचं कागदपत्र राहीलं.”  कपड्यांवरचे डाग बॅगेने लपवत अनघा म्हणाली आणि आपल्या खोलीत गेली. तिला बाबांना उगाच टेन्शन द्यायचं नव्हतं. तिचे

बदललेले कपडे पाहून सुधीररावांच्या लक्षात आलं. त्यांनी तिला छत्री दिली. तिच्या डोक्यावरून मायेने हात फिरवला आणि" नीट जा!" एवढंच म्हणाले.

'ममता इंडस्ट्रीज' रिक्षावाल्याने गेटजवळ रिक्षा थांबवली." मॅडम इथेच सोडू कि आत सोडू? " त्याने तिला विचारलं.

" राहू दे इथेच थांबवा." असं म्हणत अनघा खाली उतरली. गेटवरून तिला 'ममता इंडस्ट्रीज' ची भव्यता दिसत होती. दुतर्फा गुलाबांची झाडे लावली होती. त्या पलीकडे दूरवर लॉनची हिरवळ पसरली होती. पाण्याच्या कारंजांनी शोभा वाढवली होती. मुख्य इमारतीच्या खाली भव्य पार्किंग होते. तिथे खूप महागड्या गाड्यांची गर्दी झाली होती. प्रवेशद्वारातून आत जाण्यापूर्वी अनघाला ओळख पास द्यावा लागला. तसेच कोणाला, किती वाजता व कशासाठी भेटायचे आहे याची माहिती द्यावी लागली. सर्व औपचारिकता पूर्ण झाल्यावर अनघा आतमध्ये गेली. रिसेप्शनकडे तिने मिटिंगची विचारणा केली.

"मॅडम, चौथ्या मजल्यावर खोली नं. २ मध्ये मिटिंग आहे. मिटिंग सुरु झाली असेल. कृपया लवकर जा." सफाईदार इंग्रजीत रीसेप्शनीस्टने माहिती दिली. अनघाच्या पोटात गोळा आला. तिने दीर्घ श्वास घेतला पण तरीही हृदयाची धडधड कमी होईना. ती लिफ्टमध्ये शिरली. लिफ्ट चौथ्या मजल्यावर थांबली अनघा बाहेर आली. समोरच रूम नं. २ होता ज्यावर 'कॉन्फरन्स हॉल' म्हटलं होतं. स्वतःवर ताबा मिळवत तिने दरवाजा हळूच उघडला.

अविनाशची नजर दरवाज्यात उभ्या असलेल्या मुलीकडे गेली. त्याला उशीर झालेला आवडत नसे कारण वेळेच्या बाबतीत तो अगदीच अचूक होता. आपोआपच त्याच्या डोक्यावर आठ्या पडल्या. माधवरावांनी हातानेच अनघाला आत बोलावलं आणि ते उभे राहिले. त्यांनी घसा खाकरला आणि बोलायला सुरुवात केली," नमस्कार, आपण आज कशासाठी जमलोय याची सर्वांना कल्पना असणारच, आपण वाशीमध्ये कंपनीचा नवा प्लांट सुरु करतोय त्यासाठीच संपूर्ण आर्कीटेक्ट संदर्भात कोणाशी डील करायचं हा आजचा विषय आहे. मी माझी ओळख करून देतो. मी माधव कुलकर्णी, इथे उपस्थित सर्वांचं आपल्या कंपनीमध्ये स्वागत करतो."

त्यांचा 'आपली कंपनी' हा शब्द अनघाला खूप आवडला. एवढ्या मोठ्या कंपनीचे मालक पण किती साधे आहेत. तिला माधवराव फार आवडले. त्यानंतर एक एक करत प्रत्येकजण आपला प्रोजेक्ट समजावून सांगू लागले.

अनघाचा नंबर आला. तिने आधी माधवरावांना 'नमस्कार' म्हटलं. मग तिने आपल्या लॅपटॉपवरचं प्रेझेन्टेशन सुरु केलं. सर्वप्रथम तिने कंपनीची सध्यस्थिती, नवीन प्लांट मधलं प्रोडक्शन, तिथल्या गरजा, हे सर्व सांगितलं. मग तिने व तिच्या टीमने जे डिझाईन बनवलं होतं ते दाखवलं. ते डिझाईन बनवताना कंपनीच्या जास्तीत जास्त फायद्याचा कसा विचार केलाय हे स्पष्ट केलं, सर्वात शेवटी खर्च, लागणारं मटेरियल हे समजावून सांगितलं. या डिझाईनचं वैशिष्ट्य म्हणजे नैसर्गिकपणा जपला होता. त्यामुळे साहजिकच मशिनरीबरोबर काम करावं

लागणाऱ्या कामगारांना जास्त आल्हाददायक वाटणार होतं. तसेच महत्वाचे विभाग जवळ ठेवले असल्याने उत्पादनं, वितरण यातला वेळ वाचणार होता. माधवरावांना प्रोजेक्ट मनापासून आवडला. त्यांनी प्रक्रियेसाठी अविनाशकडे पाहिलं. अविनाशने अनघाला दोन-तीन प्रश्न विचारले व आभार मानून बसायला सांगितलं.

“धन्यवाद, सर्वांनीच खूप चांगलं सहकार्य केलं. आम्ही लवकरच चर्चा करून तुम्हाला कळवू. पुनश्च कंपनीच्या वतीने मी आभार मानतो.” असं म्हणून त्याने मिटिंग संपल्याचं जाहीर केलं. मग आलेल्यांना डायनिंग हॉलमध्ये आमंत्रित करण्यात आलं. तिथले एकंदरीत वातावरण, काम करणारी लोक या सर्वांनीच अनघा भारावून गेली होती. निघण्यापूर्वी एकदा माधव सरांना भेटायला हवं असा विचार करून ती रीसेप्शनीस्टकडे आली.

“हो सर आहेत मोकळे. टॉप फ्लोअरला त्यांची केबिन आहे.” धन्यवाद म्हणत अनघा लिफ्ट मध्ये शिरली.

माधव सरांची केबिन खूपच प्रशस्त होती. त्यांच्या समोरच्या मोकळया काचेच्या टेबलवर फक्त दोन पेपरवेट होते. बाकी संपूर्ण टेबल रिकाम होतं. त्याअर्थी ते कोणतेही काम बाकी ठेवत नसावेत. त्यांच्या डाव्या बाजूला कॉम्पुटर, प्रिंटर, स्कॅनर अशा आवश्यक उपकरणांचं टेबल होतं. संपूर्ण केबिन मध्ये एक मंद गंध पसरलेला.

अनघा अजूनही केबिनच्या दारात उभी राहून पाहत होती. माधवरावांचं तिच्याकडे लक्ष गेलं. त्यांनी स्मितहास्य करत म्हटलं,” या मिस देशपांडे मॅडम, बसा.”

"निघतच होते म्हटलं एकदा तुम्हाला भेटून जाव." अनघा म्हणाली.

"बर केलात. मी तुमचाच प्रोजेक्ट वाचत होतो. तुमचा अभ्यास खुप छान आहे. माझ्या मॅक्झीमम रिक्वायरमेंट्स तुम्ही पूर्ण केल्या आहेत. मी लवकरच तुमच्या कंपनीला काय ते कळवतो." माधवराव म्हणाले." तुमच्याबरोबर काम करायला मिळालं तर ते माझं भाग्य आहे. बरं मी येते." असं म्हणत अनघा उठू लागली.

"तुमचं जेवण झालं का? " माधवरावांनी आवर्जून विचारलं. त्यांच्या भारदस्त व्यक्तिमत्त्वाची अनघावर चांगलीच छाप पडली होती. मानेनेच होकार देत व नमस्कार करत ती उभी राहिली. केबिनचा दरवाजा उघडून ती बाहेर जायला आणि बाहेरून अविनाश आत यायला एकच वेळ झाली असावी. दोघेही एकमेकांवर आपटणारच होते पण प्रतीक्षिप्त क्रियेमुळे अनघाच्या हातातले सामान तेवढे पडले.

"माफ करा माझं लक्ष नव्हतं. आप्पा जरा ह्यांना सामान उचलून द्या." असं म्हणत अविनाश थोडा लांब उभा राहिला. आप्पा आले त्यांनी अनघाचं सामान उचलून दिलं. तिने आप्पांचे आभार मानले पण अविनाशशी काही बोलावं असं तिला वाटलं नाही. तिच्या मनाने तो शिष्ट असल्याची नोंद केली व तिच्या आयुष्यात अशा माणसांना जागा नव्हती मग ते कितीही हुशार व सुंदर असोत !

ती निघून गेल्यावर अविनाश आत आला.” बाबा मला बोलावलंत? ” त्याने विचारले.” मला दोन प्रोजेक्ट्स आवडले आहेत. तुझं काय मत आहे? ” हातातल्या दोन प्रोजेक्ट्सच्या फाईल्स अविनाशकडे सरकवत ते म्हणाले.

“बाबा मला वाटतं ‘साठे अँड कंपनीज’ यांचा प्रोजेक्ट नक्कीच जास्त चांगला वाटतो. मी आपले कंपनीचे आर्किटेक्ट दिघे सरांशी यावर चर्चा केली. त्यांचंही तेच मत आहे. आपण लवकर डिझाईन फायनल करून काम सुरु करूया. अर्थातच तुमचा निर्णय शेवटचा आहे.” असं म्हणत त्याने त्या प्रोजेक्टमधले फायदे-तोटे याचं स्वतः केलेल विश्लेषण माधवरावांना दिलं. त्यांनी ते वाचलं व त्यांच्या चेहऱ्यावर समाधान झळकलं. आपल्या मुलाची काम करण्याची क्षमता व वेग याचं त्यांना कौतुक वाटलं.” ठीक आहे तसं रीतसर त्यांना कळव.” एवढंच ते म्हणाले.

-------------*-------------

अनघाने मोबाईल स्वीच ऑन केला आणि लगेच रिंग वाजली. स्क्रीनवर राधाचं नाव वाचून तिला खूप बरं वाटलं." हॅलो, हा बोल राधा. हो मस्तच झाली मिटिंग. काय सांगते? तू इकडे आली आहेस? कुठे आहेस? मी आलेच. मस्त कॅफे टेरीयात जाऊ." राधा खाली पार्किंगमध्येच होती. मिटिंग चांगली झाल्याने इतक्या दिवसांचा ताण एकदम निघून गेला होता. राधा आल्याचं पाहून तिची कळी खुलली. लिफ्टमध्ये शिरत तिने ग्राउंड फ्लोअरचं बटन दाबल. पार्किंगमध्ये राधा तिच्या ज्युपिटरवर बसली होती.

"ए ! हाय बरं झालं आलीस." अनघा तिच्याजवळ जात म्हणाली. अचानक तीचं लक्ष कोप-यात पार्क केलेल्या 'स्कोडा ओक्टाविआ' कडे गेल. गाडीची नंबरप्लेट पाहताच तिला धक्का बसला." अरे! हीच ती कार. म्हणजे ती व्यक्ती याच कंपनीत काम करते. चांगलाच धडा शिकवायला हवा." अनघा रागाने म्हणाली.

"एक मिनिट मला समजेल असं बोल. काय झालं एवढं चिडायला? " राधाने न समजून विचारलं.

"अग सकाळी मी मिटींगला जात होते. तर या कारवाल्याने चिखल अंगावर उडवला. एवढा खोळंबा झाला. तशीच रीक्षेने घरी गेले आणि रिक्षेनेच एवढ्या लांब आले." " अरे देवा, ह्या मोठ्या लोकांचं असंच असतं. मग आता मूड नको घालवू. मी पिक्चरची दोन तिकीटं आणली आहेत," राधा तिला समजावत म्हणाली.

"नाही या गाडीवाल्याला धडा शिकवते आधी." असं म्हणत आधी तिने आपलं सामान राधाकडे दिलं आणि ती कारजवळ गेली. इकडे तिकडे पाहत हळूच खाली बसली आणि तिने तिची कंपास पेटी काढली व त्यातल्या कंपासने टायरला भोक पाडलं. टायर फुटला, राधा घाबरली." अनघा कोणीतरी पाहिल. चल बाई." असं म्हणत तिने अनघाला उठवल." चल आता पटकन पाठी बस," असं म्हणून राधाने गाडी स्टार्ट केली.

"अगं काही नाही, कोणी नव्हतं तिथे. आता मजा येईल. संध्याकाळी गाडीवाल्या व्यक्तीला चांगलीच अद्दल घडेल." असं म्हणत दोघी निघून गेल्या. पण अनघाला कुठे माहित होतं कि गाडीवाली व्यक्ती म्हणजे अविनाश कुलकर्णी होता आणि पार्किंगमध्ये कोणी माणूस नसला तरी कॅमेरा होता व त्याने आपलं रेकॉर्डिंगचं काम चोख केलं होतं.

-------------*-------------

“बाबा मी निघतोय. आईला घेऊन मावशीकडे जायचं आहे.” इंटरकॉमवरून अविनाशने माधवरावांना सांगितलं आणि आप्पांना हाक मारली.” आप्पा भाऊंना गाडी काढायला सांगा.” असं म्हणत आपली ब्रीफकेस घेऊन तो पार्किंगमध्ये आला.” मालक गाडीचा टायर पंक्चर आहे. मी मेकॅनिकला बोलावलं आहे.” भाऊ अपराधीपणे म्हणाला.

“पंक्चर? कस शक्य आहे? कालच सर्व्हिसिंग झालं आहे. तुम्ही निट पाहिलं का? अविनाश गाडीकडे येत म्हणाला, तोपर्यंत मेकॅनिक आलेला व त्याने काम सुरु केलं होतं.

“मालक टायर फुटला आहे. बहुदा हा कोणीतरी फोडला आहे. कारण एवढ्या नवीन एम. आर. एफ. च्या टायरला काही होत नाही.” मेकॅनिक म्हणाला.

अविनाशला आश्चर्य वाटलं. कोण असेल? असं म्हणत त्याने मेकॅनिकला टायर बदलायला सांगून तो वर आला.

“आप्पा राजूला आजचं पार्किंगमधलं फुटेज मला पाठवायला सांगा.” असं सांगून तो आपल्या खुर्चीवर बसला.

इंटरकॉम वाजला.” हॅलो सर मी आजचं फुटेज तुम्हाला मेल केलं आहे.” राजूने माहिती दिली. अविनाशने मेल ओपन केला. दिवसभरचं फुटेज बघायला त्याला वेळ लागला पण तरीही त्याची उत्सुकता ताणली होती. स्क्रिनवरची व्यक्ती पाहुन त्याला कमालीचं आश्चर्य वाटलं. हीच

ती सकाळी 'साठे अँड कंपनीज्' कडून आलेली. काय नाव तीचं हा अनघा देशपांडे. पण तिने असं का केलं असेल? अविनाशला आश्चर्य वाटलं आणि रागही आला. तेवढ्यात आप्पा आत आले. ‘साहेब गाडीचं काम झालं आहे.” त्यांनी माहिती दिली.” ठीक आहे.” असं म्हणून तो निघाला.

गाडीतही त्याचं विचारचक्र चालू होतं. गाडी कधी घरी आली त्याला समजले नाही.” अरे अवी किती उशीर? मी केंव्हाची वाट बघतेय.” ममताजी झोपाळयातून उतरत म्हणाल्या.

“मी फ्रेश होऊन येतो मग निघु.” असे म्हणत तो आपल्या खोलीकडे वळला.

-------------*-------------

“अनु आलीस बरं झालं. बस पाहू इथे. आता सांग कशी झाली मिटिंग? ” सुधीररावांनी अधिरतेने विचारले.

“अहो बाबा मस्त झाली एकदम, मला खात्री आहे हा प्रोजेक्ट मलाच मिळणार.” अनघा आत्मविश्वासाने म्हणाली.

“चल मस्त बातमी दिलीस. आता छानशी जायफळ मिश्रीत कॉफी करतो.” स्वयंपाकघरात जात सुधीरराव म्हणाले. तेवढ्यात फोनची घंटी वाजली. अनघाने फोन उचलला.

“हॅलो, अनघा स्पिकिंग.”

“नमस्कार, अनघा मी मिसेस उषा देसाई बोलतेय.” पलीकडून आवाज आला.

“अरे मॅडम कश्या आहात? आज कसा काय फोन केलात? ”अनघा आनंदून म्हणाली.

“अगं आश्रमात पुढच्या महिन्यात गॅदरिंग आणि इतर स्पर्धा आहेत. त्या संदर्भात तुझ्याशी बोलायचे होते. कधी वेळ आहे तुला? ” उषा दिदींनी विचारले.

“अहो मी मोकळीच आहे आजच येते आश्रमात. तसंही बरेच दिवसात येणं नाही झालं.” अनघा उत्साहाने म्हणाली.

“घरीच येशील का? हे पण नाही आहेत. निवांत बोलता येईल.”  उषादिदिनी विचारले.

"ठीक आहे, मी साधारण तासाभरात पोहचते" असे म्हणून अनघाने फोन ठेवला. तिचं शेवटचं वाक्य कॉफीचे पेले घेऊन येणाऱ्या सुधीररावांनी ऐकले.

"आत्ताच आलीस आणि लगेच कुठे निघालीस? "

"बाबा अहो उषा मॅडमचा फोन आलेला. त्या हो, सावली आश्रमाच्या सर्वेसर्वा त्यांना आश्रमातल्या गॅदरिंगसाठी माझी मदत हवी आहे. म्हटलं ठीक आहे समक्षच बोलू. त्यांनी घरी बोलावले. तशी आत्ता मी मोकळीच आहे. साठे मॅडमनाही मिटींगचं रिपोर्टिंग केलं आहे. तर जाऊन येते, म्हणजे जाऊ ना? "अनघाने विचारले. तिच्या प्रश्नावर सुधीरराव हसायला लागले.

"हसायला काय झालं? "अनघाने आश्चर्याने विचारले.

"अनु तू आता काही लहान आहेस काय? परवानगी कसली घेतेस? जाऊन ये मस्त, फक्त उशीर होणार असेल तर कळव." असे म्हणत ते रिकामे पेले घेऊन स्वयंपाकघरात गेले. खरं तर अनघाला आता कुठे जायचं जीवावर आलेलं. तिने मस्त झोपायचा विचार केलेला. संध्याकाळचे चार वाजले होते. उषा मॅडमचं घर तसं जवळ होतं पण तरीही शेवटी आळस झटकण्यासाठी तिने मस्त अंघोळ करायचा निर्णय घेतला.

अंघोळ झाल्यावर तिला खूप बरं वाटलं. सैलसर कुरता आणि सलवार घालून तिने केसांना छान क्लिपमध्ये गुंडाळले नेहमीच्या वेणी ऐवजी तिला असं कधीकधी करायला आवडे.

"बाबा मी गाडी घेऊन जाते." चावी घेत तिनं सांगितले.

“नीट जा फोन घेऊन जा म्हणजे मला कळवता येईल.” सुधीरराव म्हणाले.

अनघाने ॲक्टिवा सुरु केली आणि ती उषा मॅडमकडे निघाली.

“उषा” हा बंगला दिसल्यावर तिने वेग कमी केला आणि त्यांच्या घराच्या गेटमधून गाडी आत नेली व पार्क केली. बंगल्याच्या व्हरांड्यात उषा दीदी तिची वाट पाहत होत्या तिला पाहताच त्या सुहास्य वदनाने तिच्या स्वागताला उभ्या राहिल्या.

“हे काय मॅडम. मी कुणी पाहुणी आहे का? चला आज छान गप्पा होतील.” अनघा संकोचून म्हणाली.

“अनघा तुला माहीतच आहे आम्हाला मुल नाही. हा आश्रमच माझं सर्वस्व आहे. तिथली मुलं मला माझीच वाटतात. दरवर्षी गॅदरिंगचा कार्यक्रम छान साजरा होतो. पण तू आश्रमात यायला लागल्यापासून तिथल्या मुलांना तुझा खूप लळा लागला आहे. तेंव्हा यंदाचं नियोजन तू करावं असं मुलांचं आणि शिक्षकांचं देखील म्हणण आहे.” उषा दीदी भावूक होत म्हणाल्या.

“मला आनंदच आहे. आपण. . . . .” अनघा बोलत असतानाच बाहेर गाडी पार्क केल्याचा आवाज आला आणि पाठोपाठ” मावशी. !”अशी हाक ऐकू आली.

“अरे अवी आला वाटतं” उषादीदी आनंदून म्हणाल्या आणि लगबगीने बाहेर गेल्या. आपण जावं कि न जावं असा अनघाला पेच पडला तेवढ्यात रघुकाकांनी अनघाला हाक

मारली. रघुकाका म्हणजे उषा दिदिंचे जुने नोकर. अगदी घरच्च्यांसारखेच होते. अनघावर त्यांचा जीव होता. दिसायला एवढी सुंदर, हुशार असूनही तिच्यातला नम्रपणा त्यांना आवडायचा. अनघा आत निघून गेली आणि त्याचवेळी दिवाणखान्यात अविनाश, ममताजी व उषादीदी प्रवेशते झाले.

“ताई अचानक कसं येणं केलंस आणि अविला कशी काय सवड मिळाली? आधी सांगायचं ना ! उषादिदिंनी एकामागोमाग एक प्रश्नांची सरबत्ती केली.

“मावशी अगं आईला कधीपासून यायचं होतं. मलाच वेळ नव्हता . म्हटलं आज अचानक जाऊन तुला सरप्राइज देऊ. हे काय, काका कुठे? ”अविनाशने विचारले.

”अरे तुझ्या सरप्राइजमुळेच त्यांची भेट होऊ शकली नाही. ते परगावी गेले आहेत उद्या येतील.” उषा दीदी म्हणाल्या.

“मस्त वास दरवळला आहे. रघु काकांनी काहीतरी खमंग केलेलं दिसतंय.” अविनाश म्हणाला.

“अरे हो, मटार पॅटीस केले आहे. बस तू मी आलेच.” असे म्हणून उषा दीदी उठतच होत्या तेवढ्यात आतून अनघा सरबत आणि पॅटीसने भरलेल्या डीशेसचा ट्रे घेऊन आली. उषा दीदी आणि ममताजी शेजारी बसल्या होत्या आणि त्यांच्या समोरच्या सोफ्यावर अविनाश बसला होता. त्यामुळे पाठमोऱ्या ट्रे ठेवणाऱ्या अनघाला त्याने ओळखले नाही.

"अरे बरं झालं तूच आणलस ते. थांब हा ओळख करून देते. हि ममता ताई माझी मोठी बहीण," अनघाने हात जोडून नमस्कार केला.

"आणि हा अविनाश माझा भाचा," आता अनघा वळली आणि समोर अविनाश कुलकर्णीला पाहून एकदम आश्चर्यचकित झाली. अनघाकडे पाहून अविनाशला जास्तच आश्चर्य वाटले." हि इथे कशी काय? " असा विचार त्याच्या मनात आला त्याचबरोबर संध्याकाळी पाहीलेलं फुटेज त्याला आठवले आणि खूप राग आला. त्याच्या कपाळावर आठ्या पडल्या. आपण स्माइल देऊनही त्याबदल्यात त्याच्या डोक्यावरच्या आठ्या पाहून अनघाला वाईट वाटले.

" तुम्ही बसा बोलत. मॅडम मी निघते. आपण नंतर बोलू ," कस नुस अनघा म्हणाली. तिचा मुडच गेला होता.

" अरेच्चा तू कुठे चाललीस. तू बस आमच्यात. ताई, हि अनघा, आर्किटेक्चर आहे, खूप हुशार आहे. आपल्या आश्रमामध्ये नेहमी येते मला हिची खूप मदत होते." उषा दिदींनी केलेल्या कौतुकाने अनघाला खूप लाजल्यासारखेझाले.

खरं तर अनघा पाहताक्षणी ममताजींना खूप आवडली होती. त्यात नेमकी ती अविनाशच्या बाजूला उभी असल्याने त्यांच्या मनात येऊन गेले ," केवढी गोड मुलगी आहे, यांचा जोडा किती छान दिसतो आहे."

त्या उभ्या राहिल्या , त्यांनी हाताला धरून अनघाला शेजारी बसवले आणि म्हणाल्या" बस बाळ. आश्रमासाठी काहीतरी करणारी माणसं विरळच असतात. बरं झालं आज तुझी भेट झाली." असं म्हणत त्यांनी पॅटीसची डिश आणि सरबताचा ग्लास अनघाकडे दिला. प्रेमळ ममताजींना पाहून अनघाला बरं वाटलं. तिच्या मनात आलं ," खरंचं ममताजी आणि माधवरावांचा प्रेमळपणा अविनाशमध्ये जराही कसा आला नाही? "

ममताजी उषा दीदींना म्हणाल्या ," उषा तू वर टेरेसवर काहीतरी बाग केली आहेस ना , चल मला बघायची आहे." एवढं बोलून त्या अविनाशकडे वळत म्हणाल्या" अवि तुम्ही दोघे इथेच गप्पा मारत बसा, आम्ही आलोच." त्याच्या उत्तराची वाट न पाहता त्या उषा दीदींना घेऊन निघून गेल्या.

रिकामा दिवाणखाना आणि शांत बसलेला अविनाश हे अनघाला असह्य झालं. तसंही त्याच्याशी बोलायची तिची इच्छा नव्हती. रिकाम्या डिशेस घेऊन ती आत जायला वळली, "एक मिनिट, मला तुमच्याशी थोडं बोलायचं आहे? " अविनाशने सांगितले. अनघाने त्याच्याकडे प्रश्नार्थक नजरेने पाहिले व ती पुन्हा बसली.

" खरंतर मला एका शंकेचे निरसन करायचे आहे. तुम्ही कंपनीच्या पर्किंगमधल्या कारचा टायर का फोडला? " अविनाशने बॉम्ब टाकला.

ह्या प्रश्नाची अनघाने अपेक्षाच केली नव्हती. तिला वाटलं नक्कीच ज्याची कार आहे त्याने तक्रार केली असावी आणि ज्याअर्थी हा असं विचारतोय म्हणजे पुरावा असणार. काय उत्तर द्यावे हे तिला सुचेना. खरं बोलायचं ठरवून ती म्हणाली,

“ मला त्या कार मालकाला धडा शिकवायचा होता म्हणून.”

अविनाशला खूप आश्चर्य वाटलं.

“ असं काय नुकसान केलं आहे त्या मालकाने तुमचं? ” तो न समजुन म्हणाला.

“ अहो रस्त्यावर कार विमानाच्या वेगाने चालवतात ते. पावसाचे दिवस आहेत. खड्ड्यांमधलं पाणी कोणावर उडू शकतं याचं त्यांना काहीच नाही,” अनघा कृतककोपाने म्हणाली. अविनाश गोंधळला, परंतू त्याला अनघाच्या बोलण्याची गंमत वाटली.

“म्हणजे नक्की काय चुकले? कार विमानाच्या वेगाने चालवतात हे की अंगावर पाणी उडले हे,” तिची फिरकी घेत तो म्हणाला.” सर्वच! आज त्यांच्यामुळे खड्ड्यातलं घाणेरडे पाणी माझ्या अंगावर पडलं. मला माहितेय मी त्यांचं नुकसान केलं आहे ते. पण माझा निरोप त्यांना द्या म्हणजे त्यानाही कारण समजेल.” अनघा म्हणाली.

अविनाशला अनघाच्या धाडसाचं कौतुक वाटलं. तिच्या बोलण्याचा खरेपणा त्याला जाणवला. अशी मुलगी त्याला पहिल्यांदाच भेटली होती.

इकडे टेरेसवरती ममताजी उषादिदिना म्हणाल्या," उषे, अगं मला तुझ्याशी अवी बद्दल बोलायचं आहे. त्याचं आता लग्नाचं वय झालंय पण तो विषयच काढत नाही. एकही मैत्रीण नाही याला. हे सुद्धा फारसे मनावर घेत नाहीत. तुझं ऐकेलं तो. तू  समजाव बाई त्याला."

"अगं हो ताई, माझ्या आलंय लक्षात ते. मी बोलेन त्याच्याशी. तू  नको काळजी करु." उषा दीदी समजावत म्हणाल्या.

"ए ती अनघा कशी आहे? मोठी गोड मुलगी आहे. मला खूप आवडली. अशीच आपल्या अविसाठी छान आहे. काय वाटतं तुला? " ममताजीनी विचारलं.

"खरंतर माझ्या मनात केंव्हापासून होतं. आज तू  तिला स्वत:हून पाहिलस ते बरं केलस . . . अगं शंभर नंबरी सोन आहे. अशी मुलगी शोधून सापडायची नाही. तिची आई लहानपणीच गेली. वडील शिक्षक आहेत. दोघंच राहतात. अविला आणि अनघाला थोडा वेळ देऊया बाकीची तू  नको काळजी करू. तिचे वडील नक्कीच तयार होतील आणि आपला अवी लाखात एक आहे." उषा दीदी एका दमात बोलून गेल्या. दोघींनी आनंदाने एकमेकिंना मिठी मारली. इकडे दिवाणखान्यात बसलेले अविनाश, अनघा यापासून अनभिज्ञ होते.

घड्याळयात पाहिल्यावर अनघा चपापली. आठ वाजून गेलेले बाबा वाट पाहत असणार. निघायला हवय हे तिला जाणवले.

“रघुकाका उषा मॅडमना सांगा मी निघते.” अनघाने दिवाणखान्यातूनच रघु काकांना हाक मारली. तेवढ्यात तिकडे आलेल्या उषा दिदींनी ते ऐकले.” अगं उशीर झालाय, आता जेऊनच जा. अविनाश सोडेल तुला.” त्या म्हणाल्या.

“नाही नको. बाबा जेवायला वाट पाहत असतील. पुन्हा कधीतरी आज नको.” अनघा घाईघाईने म्हणाली.

“बरं अवी, सोडून ये तिला. उशीर झालाय.” ममताजी म्हणाल्या.

नाही, नको. मी माझी बाईक आणली आहे. येते मी.” एवढं बोलून अनघा बाहेर आली. तिला सोडायला ममताजी आणि उषादिदि सुद्धा आल्या. अविनाशही बाहेर येऊन थांबला. का कुणास ठाऊक. . . . .

अनघाच्या बाईक शेजारीच अविनाशने कार पार्क केली होती. कार पाहून तिला फार अपराधी वाटलं . तिने अविनाशकडे पाहिलं तर तो तिच्याकडे एकटंक पाहत होता. अनघाने पटकन डीकीतून हेल्मेट काढुन डोक्यावर घातलं आणि मागे न पाहता ती निघून गेली, अविनाशच्या मनात घर करून.

-------------*-------------

अविनाश आणि ममताजी घरी आले. माधवराव दिवाणखान्यात बसले होते.

“अरे वा !कुठून येताय दोघं? ” त्यांनी मिश्किलपणे विचारलं.

“उषाकडे गेलेलो. तुम्ही जेवलात ना? मी उमाला तुमचं जेवण बनवायचं सांगून गेले होते. आम्ही जेऊन आलो आहोत.” ममताजी त्यांच्या शेजारी बसत म्हणाल्या.

“हो हो ! मी जेवलोच. उषा बरी आहे ना आणि दिनकर भेटले का? माझी त्यांची भेट नाही.” माधवराव म्हणाले.

“ते बाहेर गेले आहेत , उद्या येतील.” ममताजी म्हणाल्या.

“मी झोपतो आता. तुम्ही बसा बोलत.” अविनाश उठत म्हणाला.

अविनाश खोलीत आला. झोपण्यापूर्वी नेहमीप्रमाणे त्याने मस्त अंघोळ केली. बेडवर अंग टेकल्यावर त्याला बरं वाटलं. दिवसभरातल्या घडामोडींचा विशेषतः अनघाचा विचार त्याच्या मनात आला. त्या विचाराबरोबर त्याच्या चेहऱ्यावर एक मंद स्मित उमटलं आणि त्याला झोप लागली.

-------------*-------------

“मॅडम तुम्हाला साठे मॅडमनी केबिनमध्ये बोलावले आहे.” शिपायाने अनघाला निरोप दिला. ती लगेच मॅडमच्या केबिनकडे निघाली.” मे आय कम इन मॅडम? ” दरवाजा उघडत तिने विचारले.

“येस, प्लीज कम. बस अनघा कालच्या प्रोजेक्ट बद्दल बोलायचं होतं.” साठे मॅडम हसत म्हणाल्या.

अनघाच्या पोटात गोळा आला, काय असेल?

“मॅडम काय झालं? ” तिने धास्तावून विचारलं.

“अगं प्रोजेक्ट आपल्याला मिळाला. क्रेडीट गोज टू यू. मला तुझी खात्री होती,” साठे मॅडम आनंदून म्हणाल्या. अनघाचा आनंद गगनात मावेना. तिची मेहनत फळाला आली होती.

“ मी सेलिब्रेशन म्हणून पार्टी अरेंज केली आहे. तसंही समीर, माझा मुलगा अमेरिकेहून कालच परत आलाय. मस्त धमाल करू. ममता इंडस्ट्रीज मध्ये इन्वीटेशन घेऊन मात्र तू स्वतः जा.” साठे मॅडम अनघाचा हात धरत म्हणाल्या.

"येस मॅडम. नक्कीच. मी येते आता. फंक्शनची तयारी करायची आहे." अनघा उठत म्हणाली.

"जाताना तुझी प्रमोशनची ऑर्डर घेऊन जा." साठे मॅडम डोळे मिचकावत म्हणाल्या. अनघा खूपच खुश झाली. तिने साठे मॅडमचे मनापासून आभार मानले आणि ती खाली आपल्या जागेवर आली. एव्हाना प्रोजेक्टबद्दल आणि अनघाच्या प्रमोशनबद्दलची बातमी संपूर्ण ऑफिसमध्ये पसरली होती. तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत होता.

-------------*-------------

अविनाश ऑफिसच्या कामात गर्क होता. तेवढ्यात त्याच्या केबिनच्या दारावर टकटक झालं. त्यापाठोपाठ” साहेब आत येऊ का? ” असं म्हणत श्रेयश आणि सुशांत आत मध्ये आले. त्यांना पाहताच क्षणी अविनाशला खूप आनंद झाला. तिन्ही मित्रांची गळाभेट झाली. लहानपणापासून तिघांची गट्टी होती. शाळेत त्यांना त्रिमूर्ती म्हटले जाई.

“श्रेयस अरे कधी आलास माथेरानहून? आरती कशी आहे? ” अविनाशने हसत विचारले. श्रेयसच नुकतंच लग्न झालं होतं. त्यामुळे सध्या त्याचं विमान हवेत तरंगत होतं.

“अरे हा काय प्रश्न झाला का? काल आला आहे पण अजूनही माथेरानमध्येच आहे.” सुशांत गमतीने म्हणाला.

“ए आता तुम्ही दोघे सुरु होऊ नका. किती दिवसांनी भेटतोय. अव्या आता काम बंद कर, मस्त बाहेर जाऊ, गप्पा मारू.” श्रेयस म्हणाला.” ओके. डन. आपल्या आवडत्या जुहू बीच वर जाऊ. मग डिनर, चला.” फाईल बंद करत अविनाश म्हणाला. तिघे मित्र जुहू बीच वर आले. फेसाळ लाटांकडे बघत गप्पांमध्ये बुडून जाणे हा त्यांचा नेहमीचा बेत होता.

“ यार आजचा डिनर माझ्याकडून आहे कारण मला एक आनंदाची बातमी द्यायची आहे,” सुशांत म्हणाला.

“ अरे व्वा ! पटकन बोल,” श्रेयसने अधिरतेने विचारले.

“ काल फायनली मी तिला प्रपोज केलं आणि ती हो म्हणाली,” सुशांत हसत म्हणाला.

श्रेयसला एवढा आनंद झाला कि त्याने सुशांतच्या अंगावर उडीच मारली. अविनाशला हि खूप बरं वाटलं कारण सुशांत कॉलेजपासून तिच्यावर प्रेम करत होता." चला लग्न कधी करताय? लवकर सांग म्हणजे आम्हालाही प्लानिंग करता येईल." अविनाश म्हणाला." माझं सोड, आधी सांग कि तू कधी विचार करणार आहेस? अव्या अरे तुझा नक्की प्रोब्लेम काय आहे? किती जणी तुझ्या मागे आहेत ! साधी एक मैत्रीण तरी!" सुशांतने काळजीने विचारले.

“अरे गप्प बस रे, पकवू नकोस," अविनाश म्हणाला." नाही अव्या, सुश्या बरोबर बोलतो आहे. आपल्या आयुष्यात सोबत हवीच. प्रेम खूप मस्त असत. खरंच अनुभवाने सांगतोय. उलट लग्नानंतर माणूस जास्त सुखी होतो," श्रेयस म्हणाला.

“सोबत? तुम्ही आहातच कि!," अविनाशने हसत सांगितलं." पण प्रोब्लेम काय आहे? नेहमी तू हा विषय टाळतोस," सुशांत इरेला पेटत म्हणाला." टाळत नाही रे मला तेवढी कुणी आवडलीच नाही. मलाही मुली आवडल्या पण अगदी काही काळासाठी. आता तर चेहरेपण आठवणार नाहीत. जो पर्यंत एखादीबद्दल पुस्तकात वाचतो किंवा पिक्चर मध्ये बघतो तसं वाटत नाही तोपर्यंत लग्न करण्यात मजा नाही राव," अविनाश मनापासून म्हणाला." आणि ते तसं कधी वाटणार तुला? म्हातारं झाल्यावर? " सुशांतने विचारलं. यावर अविनाशने फक्त खांदे उडवले.

-------------*-------------

“हॅलो, अनु मला तुला भेटायचं आहे, आता,” राधा पलीकडून बोलत होती.” अग काय झालं? कालपासून तुझे दहा मिस कॉल्स. फोन सायलेंटवर होता. बोल पटकन.” अनघा म्हणाली.” नाही हा. भेटूया असं फोन वरून नको,” राधा घाइघाइने म्हणाली.” ठीक आहे घरी येशील का? मला तयारी करून ऑफिसला जायचे आहे.” अनघाने विचारलं.

“अग हो मी अर्ध्या तासात पोहोचते,” राधा म्हणाली. अनघाच आवरून झालं आणि राधा आली. तिने अनघाला कडकडून मिठी मारली.” अनु काल त्याने मला मागणी घातली आणि मी हो म्हंटल,” राधा लाजत म्हणाली.” कोण सुशांत का? अय्या काय सांगतेस? मी तुला आधीच सांगितलं होतं त्याचं तुझ्यावर प्रेम आहे पण तुला खोटं वाटायचं,” अनघा आनंदून म्हणाली.” अग मला त्याच प्रेम कधी कळलंच नाही. अजितच्या मागे लागून मी खरंच मूर्खपणा केला,” राधाचे डोळे पाणावले.

“गोळी मार त्या अजितला, आजपासून तो विषय बंद. आता नवीन सुरवात कर. सुशांत खूप चांगला मुलगा आहे. पाहिलंय मी त्याला,” अनघा म्हणाली.” अनु माझं तर ठरलं. पण तुझं काय? तू घेतलेला निर्णय बदलणार नाहीस का? अग रूप, गुण, चांगली नोकरी सर्वच आहे तुझ्याकडे,” राधाने विचारले.” नाही राधा तेवढं सोडून बोल. माझ्या बाबांनी माझ्यासाठी खूप खस्ता काढल्या आहेत. मी त्यांना कधीच एकटं सोडणार नाही. कधीच!” अनघा आईच्या फोटोकडे पाहत पुटपुटली.

साठे अँन्ड कंपनी मधली सर्वजण 'पार्टीज' गार्डन मध्ये जमली होती. 'ममता इंडस्ट्रीज' चं मोठं काँट्रॅक्ट मिळाल्यामुळे तिथे पार्टीचे आयोजन केले होते. सर्वत्र हसण्या खिदळण्याचे आवाज येत होते. चायनीज, पंजाबी डिशेसची रेलचेल होती. अनघा मात्र अजून घरीच होती. तिला पार्टी विशेष आवडत नसे. असे इव्हेंट्स ती टाळायची." हॅलो अनघा कुठे आहेस तू? आम्ही सगळे वाट पाहतोय तुझी," ऑफिसमधल्या नितुचा फोन आलेला." अग माझं जरा डोकं दुखतंय मी बहुधा नाही येणार," अनघा म्हणाली." ए अशी काय करतेस. मॅडम कधीच्या शोधत आहेत तुला. त्यांनीच मला फोन करायला सांगितलं आहे," नितू म्हणाली." ठीक आहे येते मी," मॅडमचा निरोप एकुन अनघाचा नाईलाज झाला. आज अगदी सिंपल जायचं तीने ठरवलं. कपाटातून सिल्कची साडी काढली. पांढऱ्या साडीवर लाल मोठ्या फुलांची बोर्डर होती. हातात तिने पांढऱ्या मोत्यांच्या बांगड्या घातल्या. गळयातही मोत्यांचा नाजूक हार घातला. केसांची सैलसर वेणी घातली आणि मोगऱ्याचा गजरा माळला. मेकअप बिकप काही नाही. खरंतर आजच्या पार्टीची उत्सव मूर्ती होती ती, परंतू तिला चार लोकात उठून दिसायचं नव्हतं पण वेडीला हे कुठे माहित होतं कि ती हिरा होती आणि हिऱ्याला चमकण्यासाठी सोन्याचेच कोंदण लागते असे नाही. अनघाने टॅक्सीनेच जायचा निर्णय घेतला. 'पार्टीज" च्या भव्य पायऱ्या चढताना तिला जाणवलं कि आजूबाजूच्या बऱ्याच नजरा आपल्यावर खीळल्या आहेत.

"अविनाश साहेब या. आजच्या पार्टीला येऊन तुम्ही पार्टीची शान वाढवलीत," साठे मॅडमनी अविनाशच स्वागत केलं. अनघा स्वतः आमंत्रणाला गेली होती त्यामुळे अविनाश येणारच होता.

“मी तुमची ओळख करून देते. हा माझा मुलगा समीर. कालच अमेरिकेहून आला आहे,” साठे मॅडमनी ओळख करून दिली.” हाय अविनाश तू इथे कुठे? ” समीर हसत म्हणाला.” म्हणजे तुम्ही एकमेकांना ओळखता? ” साठे मॅडम आश्चर्याने म्हणाल्या.” हो अमेरिकेत एका इव्हेंट पार्टीत आमची ओळख झाली. ओळखतो आम्ही एकमेकांना,” अविनाश हस्तांदोलन करत म्हणाला. अविनाशच्या डोळयासमोरून झरझरत एक वर्ष मागे गेल आणि ‘इव्हेंट पार्टी’ उभी राहिली. खरंतर पार्टीत समीर खूप प्यायला होता आणि तिथल्या एका मुलीशी लगट करताना वादावादी झाली आणि तिच्या मित्रांनी त्याला चांगलंच चोपल होतं. भारतीय म्हणून शेवटी अविनाश मध्ये पडला व त्यामुळे समीर वाचला होता. त्यामुळे त्यांची ओळख वाढली आणि मग मैत्री. पण अविनाशला फ्लर्टी नेचर अजिबात आवडायचं नाही. मुलींना उपभोगायचं आणि सोडून द्यायचं असं समीरच मत होतं. पैसा उधळायला असतो असंही त्याला वाटे. त्यामुळे अविनाशने त्याच्याशी संपर्कच तोडला ती आज भेट झाली. दोघं जण एक छोट्याश्या टेबलवर बोलत बसले. अविनाशची नजर अनघाला शोधत होती. तेवढ्यात समीर म्हणाला,” ब्युटीफुल!” अविनाशने त्या दिशेला पाहिलं आणि तो भारावून पाहतच राहिला. हातात मंगो ज्यूस घेऊन अनघा कोणाशीतरी बोलत उभी होती. किती सुंदर दिसत होती ती! अविनाशला वाटलं जाऊन तिच्याशी बोलाव तेवढ्यात अनघाने त्याच्याकडे पाहिलं. दोघांची नजरानजर झाली आणि अनघाच्या चेहऱ्यावर मंद स्मित उमटलं. अविनाशही हसला.

” तू  ओळखतो तिला? ” समीरने लगेच विचारलं.

” हो म्हणजे ओळखतो तसा,”  अविनाश म्हणाला

" ए माझी ओळख करून दे ना यार," समीर अजूनही अनघाकडेच पाहात होता.

अविनाशला मात्र मनोमन नको वाटलं. तेवढ्यात तिकडे साठे मॅडम आल्या, त्यांनी त्या दोघांची विशेषतः अविनाशची विचारपूस केली.

" मम्मा ती मुलगी कोण आहे? साडी नेसलेली? ," समीरने विचारले.

" अरे हो थांब मी ओळख करून देते," साठे मॅडम म्हणाल्या आणि त्यांनी अनघाला बोलवलं.

" अनघा अविनाश साहेबाना तू ओळखतेस. हा समीर माझा मुलगा," त्यांनी ओळख करून दिली.

समीरने चटकन अनघाचा हात हातात घेतला आणि हस्तांदोलन केल. अनघाला त्याचं हे वागणं आवडलं नाही. तिच्या डोक्याला सूक्ष्म आठी पडली, अविनाशच्या नजरेतून ती सुटली नाही.

"अनघा तू आम्हालाच जॉईन हो ना. तसंही आम्ही दोघंच बसलो आहोत." समीर म्हणाला.

त्याने पहिल्याच भेटीत एकेरीत हाक मारावी हे अनघाला अजिबात रुचलं नाही.

“तुम्ही बसा मी निघतेच आहे.” ती घाईने म्हणाली.

“हे काय तू कुठे चाललीस. आत्ताच तर आली आहेस.” साठे मॅडमआग्रहाने म्हणाल्या.

तसा अनघाचा नाईलाज झाला.

” आमच्या बरोबर बस ना प्लीज,” समीरने संधीचा अचूक फायदा घेतला. अनघा बसली, तिच्या दोन बाजूला अविनाश आणि समीर बसले.

“तू आमच्याचं कंपनीत आहेस मला माहित नव्हतं.” काही तरी बोलायचं म्हणून समीर बोलला.

अविनाश शांत होता. परंतू त्याच लक्ष अनघाकडे होतं. समीरच्या बोलण्यावर अनघा फक्त हसली. तिने कसलीही प्रतिक्रिया दिली नाही. समीरने तिला पेस्ट्री ऑफर केली. त्यावर ती फक्त हातानेच नको म्हणाली.

“हे काय तू काहीच खात नाही आहेस. डाएट वगैरे चालू आहे का? ” समीर हसत म्हणाला.

त्याच्या या प्रश्नाचं अविनाशला खूप आश्चर्य वाटलं. तर अनघाच्या डोक्यावर आठ्यांचं जाळ पसरलं.

“मला खावंसं वाटलं तर मी स्वतःहून घेईन मिस्टर समीर.” ती ताडकन म्हणाली.

“मिस्टर समीर? अगं नुसतं समीर म्हण ना. आणि अहो जाहो करायला नको आहे. मी तुझ्याच वयाचा आहे.” समीर म्हणाला.

“अनोळखी माणसांना एकेरीत हाक मारायला मला आवडत नाही.” अनघाफणकाऱ्याने म्हणाली आणि तिथून निघून गेली. समीर खूप खजील झाला. तर अविनाशला अनघाचं कौतुक वाटलं.

“कसली भारी मुलगी आहे ही.” तो मनातच म्हणाला. नंतर अनघा जास्त वेळ थांबलीच नाही. ती घरी निघून गेली.

-------------*-------------

अविनाश घरी आला. पार्टीत बरंच खाणं झाल्याने त्याला भूक नव्हती. आईला तसं सांगून तो आपल्या खोलीत आला. आंघोळ वगैरे आटोपुन तो बेडवर आडवा झाला. त्याने खिशातून मोबाईल काढला आणि गॅलरीत जाऊन पार्टीत क्लिक केलेला फोटो ओपन केला. तो अनघाचा फोटो होता. आज खरंच साडीत ती खुप गोड दिसत होती. शेवटी अविनाशने तिचे लक्ष नाही असं पाहून तो क्लिक केला होता. त्याने मोबाईल आपल्या कलर प्रिंटरला जोडला आणि त्या फोटोची प्रिंट काढली. हातातला फोटो पाहून आविनाशाच्या चेहऱ्यावर स्मित झळकलं. फोटो पाहता पाहता त्याला झोप लागली.

-------------*-------------

सुशांत आणि राधा दोघेजण एका रेस्टॉरंटमध्ये बसून कॉफीचा आस्वाद घेत होती.

"राधा किती मस्त वाटतं आहे असं तुझ्याबरोबर बसून कॉफी प्यायला" सुशांत राधाचा हात हातात घेत म्हणाला.

“सुशांत मी किती वेडी आहे रे. तुझं प्रेम कधी कळलंच नाही.” राधा नाराजीने म्हणाली.

“हे असं रोजच म्हणायला हवंय का? आपण आहोत ना एकत्र आता? तू जुनं नको आठवत बसू.” सुशांत तिला समजावत म्हणाला.

“असं विसरायचं म्हंटलं तरी पटकन विसरता येतं का? मी तुझी किती प्रतारणा केली.” राधा म्हणाली.

“ए काय यार, कसली सुंदर संध्याकाळ आहे. मस्त लाँग ड्राईव्हला जाऊया.” विषय बदलत सुशांत म्हणाला.

“ए तुझ्या मित्राच श्रेयसच लग्न झालं ना? कशी आहे त्याची वाईफ? ” एकदम आठवून राधा म्हणाली.

“आरती? मस्त आहे. दोघं खूप खुश आहेत. अरेंज वीथ लव्ह आहे त्याचं.” सुशांत खुश होत सांगू लागला.

“ हो का बरं झालं मला ना अनघाची खूप काळजी वाटते अरे.” राधा म्हणाली.

“ अनघा म्हणजे तुझी बेस्ट फ्रेंड ना. का काय झालं? ”

“अरे तू पाहिलं आहेस तिला. केवढी गोड दिसते, हुशार आहे. चांगली नोकरी आहे. पण लग्न करायचंच नाहीये तिला.” राधाने सांगितले.

“का? तिच ब्रेक अप वगैरे झालंय का? ” सुशांत आश्चर्याने म्हणाला. त्याला अनघा आठवली. खरंच ती खूप सुंदर होती.

“नाही अरे. तिला आई नाही त्यामुळे बाबांसाठी तिने हा निर्णय घेतला आहे.” राधा म्हणाली.

“अरेच्चा याला काय अर्थ आहे? याला हा पर्याय नाही. समजाव तू तिला. तिच्या वडीलांना माहित आहे का? ” सुशांत ने विचारले.

“नाही रे त्यांना कसलीच कल्पना नाही. ते नक्कीच विरोध करतील. अनघा त्यांचा जीव कि प्राण आहे.” राधा म्हणाली.

“इकडे तुझी हि अनघा आणि तिकडे आमचा अव्या. त्याचं तर भलतंच आहे. लेकाला मुलगीच कोणी पसंत पडत नाही.” सुशांत म्हणाला.

“हो का. कोण अविनाश? मला नाही आठवत.”

“अग तो बरीच वर्ष परदेशी होता. माझ्या बालपणीचा मित्र. मला त्याची काळजी वाटते.” सुशांत म्हणाला. खरंय तुझं. मला पण अनुची काळजी वाटते. मी देवाला प्रार्थना केली आहे. तिचं लवकर जुळूदे.” राधा हात जोडत म्हणाली. या सगळ्या बोलण्याची अनघा-अविनाशला कल्पनाच नव्हती.

-------------*-------------

“समीर मला वाटतं आता तू इथंच भारतातच रहावं आपला बिझनेस पहावा. तुझे डॅडी गेल्यापासून सर्व मी एकटीनेच सांभाळल आहे.” ब्रेडला बटर लावता लावता साठे मॅडम म्हणाल्या.

“येस मम्मा मी अजून पूर्ण विचार केला नाही आहे. पण हो सध्या काही दिवस मी इथेच राहून आपल्या बिझनेसमध्ये लक्ष घालणार आहे.” ऑम्लेटचा तुकडा तोंडात घालत समीर म्हणाला. त्यावेळी त्याच्या डोळयासमोर अनघा दिसली होती. समीरला अनघा खूप आवडली होती आणि काही करून तिला पटवायचं असा त्याने निर्धार केला होता. अर्थातच लग्नासाठी तो इंटरेस्टेड नव्हता. फक्त आजवर त्याने हाताळलेल्या मुली आणि अनघा यांत खूप अंतर होतं त्यामुळे त्याने तिचं मन जिंकायचं ठरवल होतं. समीर इतक्या चटकन होकार देईल याची कल्पना साठे मॅडमना नसल्याने त्याच्या निर्णयावर त्या सुखावल्या होत्या. अर्थातच आपल्या मुलाला त्या चांगल्याच ओळखत होत्या. परंतू सध्या त्यांच्याजवळ दुसरा पर्याय नव्हता.

“ठीक आहे कधीपासून जॉईन होतो आहेस? ” त्यांनी विचारले.

“शुभस्य शीघ्रम मम्मा आजपासूनच.” समीर खुर्चीवरून उठत म्हणाला आणि आपल्या खोलीत निघून गेला.

------------*------------

अनघाने आज ऑफिसला सुट्टी टाकली होती. खरंतर प्रोजेक्टची धावपळ नंतर पार्टीच प्लॅनिग यामुळे ती दमून गेली होती. तसंहि तिला आश्रमात जायचं होतं. उषा मॅडमना शब्द दिला खरा पण तिचं जाणंच झालं नाही. तिच्या आठवणी ताज्या झाल्या. तिला आठवली ती 'बनी' अनघाच्या बस स्टॉपवर एक मुलगी आणि तिची म्हातारी आजी रोज भिक मागायची. आजी आंधळी होती आणि मुलगी पाच – सहा वर्षाची! रोजची घाई असल्यामुळे अनघा कधी त्यांना पैसे देई तर कधी देत नसे. एक दिवस ती मुलगी एकटीच दिसली. म्हणून अनघाने तिला आजीबद्द्ल विचारलं तर तिने ती आजारी असल्याच सांगितलं. अनघाने ऑफिसला उशीर होत असल्याचं कळवलं आणि त्या मुलीबरोबर ती झोपडपट्टीकडे आली. सर्वत्र सांडपाणी, गटार यांचा कुबट घाणेरडा वास सुटला होता. अनघाने तोंडाला रुमाल बांधला. वस्तीतली लोक भूत पाहिल्यासारखी तिच्याकडे पाहत होती. शेवटी एकदाची ती एका छोट्याशा खोलीकडे पोचली. खोली कसली नुसते लाकडी खांबावर पत्रे टाकले होते आणि भिंती ऐवजी प्लॅस्टिक लावले होते. तिथे कोपऱ्यात पाय पोटाशी घेऊन आजी झोपली होती.

" काय होतंय आजी? तुम्ही बस स्टॉपवर आला नाहीत. मी अनघा रोज पाहते तुम्हाला आज हि मुलगी एकटीच आली म्हणून आले." अनघाने थांबत- थांबत विचारलं.

"पोरी देवासारखी आलीस बघ. मी तुला पाहिलं नाही पण तरी तुझ्याबद्दल आपुलकी वाटते. मी जास्त दिवस जगेन असं वाटत नाही. हि बनी माझी नात. तेवढी तिला कुठे तरी आश्रमात घाल. फार उपकार होतील. आत्ताच्या या दुनियेत काही खरं नाही एकटंया मुलीच.

घर मालकाचा डोळा आहे तिच्यावर, तो कधीही तिला नेऊन कुंटनखान्यात विकेल." आजी क्षण आवाजात हात जोडत म्हणाली. अनघाचे डोळे पाण्याने भरले.

"नको नको तू हिला घेऊन इधून लवकर निघ, मालक कधीही येतील." आजी हात जोडत म्हणाली.

अनघाने पटकन बनीला कमरेवर घेतल. तिने पळत जाऊन रिक्षा पकडली आणि तिला घरी आणल. तिने सुधीररावांना सर्व हकीकत वर्णन केली. त्यांनीही तिला पाठिंबा दिला, त्यामुळे तिला धीर आला. बनी लहान असली तरी झोपडपट्टीत वाढल्याने आपल्यावर काय प्रसंग आला आहे याची तिला कल्पना आली होती. ती अनघाचं शहाण्या मुलीसारखं सर्व ऐके. दोन तीन दिवसानंतर पेपर वाचतांना अनघाला उषा मॅडमना 'सावली' आश्रमासाठी मिळालेल्या पुरस्काराची बातमी वाचायला मिळाली. मग तिने तडक आश्रम गाठला. प्रत्यक्ष मॅडमना भेटल्यावर तिची खात्री झाली आणि तिने बनीला आश्रमात ठेवले. तिथून मग 'बनीला' भेटायला जात असल्याने तिला आश्रमाचा लळा लागला. ति तिथे रमु लागली. कामाव्यतिरिक्त जास्तीत जास्त वेळ ती आश्रमात देऊ लागली. आज आश्रमांच्या पायऱ्यांशी उभं राहून तिला सगळं आठवत होतं. आपल्याच विचारात हरवून गेलेली अनघा बनीने येऊन हलवल्यावर भानावर आली.

"ताई कधीची तुला हाका मारतोय मी, लक्ष कुठे आहे? ." बनी

“अगं हो तुलाच शोधात होते मी, कशी आहेस बाळा? ” तिच्या केसावरून मायेने हात फिरवत अनघा म्हणाली.

“ मी मस्त, सगळेजण तुझी आठवण काढत असतात. बऱ्याच दिवसांनी आलीस तू. मला किनई तुला गंमत दाखवायची आहे. मला शाळेत भाषणात बक्षीस मिळालं.” बनी हातवारे करत म्हणाली. भव्य पटांगण ओलांडून अनघा आश्रमात आली.

“बरं झालं तुम्ही आलात ते. मुलं तुमची खूप आठवण काढत असतात.” अंजली गोखले म्हणाली. खरंतर अंजली अनघाच्याच वयाची होती. परंतू लग्नानंतर लगेचच नवरा गेल्याने तिला पांढऱ्या पायाची म्हणून सासू-सासऱ्यांनी घराबाहेर काढलं होतं त्यामुळे ती इथेच शिक्षिकेची नोकरी करत होती आणि राहतही होती.

“अंजली तुला कितींदा सांगितलं मला अरे-तुरे कर असं आपण एकाच वयाच्या आहोत अग.” अनघा अंजलीचा हात हातात घेत म्हणाली.

अनघाला सर्व मुलींनी गराडा घातला. तिने सर्वांना खाऊ दिला तेवढ्यात उषा मॅडम आल्या.

“बर झालं आलीस ते, सर्व मुलं किती खुश झाली.”

“हो, गॅदरिंग ची तयारी करायची आहे ना !” अनघा म्हणाली.

“अनघा मी एकांकिका लिहिली आहे, आपण तिचं बसवूया का? ” अंजलीने चाचरत विचारले.

“अरे नक्कीच, आपण तीच मस्त बसवू. एक-दोन नाच बसवू. कोणाला नकला करायच्या असतील किंवा एखाद्याला भाषण करायचे असेल तर तेही घेऊ. चालेल? ” अनघा म्हणाली.

“ हो मस्त होईल कार्यक्रम.”  अंजली टाळी देत म्हणाली.

या गॅदरिंगच्या निमित्ताने ती खूप खुश होती. अनघाला बरं वाटलं. दोघीजणी मग तयारीला लागल्या.

-------------*-------------

ऑफिस मध्ये आल्या-आल्या समीरने शिपायाला बोलावले.

“अनघा मॅडमना मी बोलावलंय असा निरोप दे.”

“सर मॅडम आज रजेवर आहेत.” शिपायाने माहिती पुरवली.

“हो का? ठीक आहे.” समीर म्हणाला. आपण हिच्यासाठी इथे आलो आणि ती रजेवर. समीरला राग आला. एवढ्यात शिपायाने त्याला एक फाईल आणून दिली.” साठे मॅडमनी तुम्हाला द्यायला सांगितले आहे.” असं म्हणून तो निघून गेला. समीरने फाईल उघडली ‘ममता इंडस्ट्रीजच्या’ नव्या प्लांटच आर्किटेकट होत ते. फाईल चा संपूर्ण अभ्यास केल्यावर त्याला जाणवलं कि खरंचं प्रोजेक्ट खूपच चांगला तयार केला आहे. तो फाईल घेऊन साठे मॅडमकडे गेला.

“मम्मा छानच आर्किटेक्ट डिजाईन केलं आहे.”

“हो अनाघानेच हे सर्व बनवलं आहे.” साठे मॅडम म्हणाल्या.

“काय सांगतेस? भारीच आहे ती मुलगी.” समीरला कौतुक वाटलं.

“आज तिने का रजा घेतली आहे? ”

“हे बघ समीर माझा स्टाफ म्हणजे माझी फॅमिली आहे, मी इथे सर्वांना आदराने वागवते कामाव्यतिरिक्त मी कोणालाही खाजगी प्रश्न विचारत नाही. रजेचं कारण हेही त्यात मोडतं. सो आय डोन्ट नो !”त्या म्हणाल्या. यावर समीर काहीही न बोलता निघून गेला. शेवटी आपल्या आई विषयी त्याच्या मनात दरारा होता आणि तो तिला वचकून होता.

दुसऱ्या दिवसापासून अनघाचं नियमित रूटीन सुरु झालं. समीर तिच्याशी या-ना त्या कारणाने बोलायचा खूप प्रयत्न करी पण अनघा मात्र त्याला कधी संधीच देत नसे. तिच्या कठोर बोलण्याने आणि फटकळ वागण्याने तो हैराण झाला होता. एक दिवस तिच्याशी स्पष्टच बोलायचं त्यानं ठरवलं आणि इंटर कॉम उचलला.

“ हॅलो अनघा मला तुमच्याशी थोड बोलायचं होतं.” एव्हाना त्याने अनघाला अहो जाहो करायला सुरुवात केली होती.

“हा बोला ना !” अनघा तुटकपने म्हणाली.

“नाही इथे नको आपण बाहेर कॉफी प्यायला जाऊया का? ”समीरने थोड चाचरत विचारलं.

“मला वेळ नाही इथेच बोला प्लीज.” आवाजावर संयम ठेवत अनघा म्हणाली.

“ठीक आहे, अॅट लिस्ट केबिन मध्ये तरी येता का? ” समीरने विचारले.

“ओके !” म्हणत अनघाने फोन ठेवला. काही तरी मनाशी ठरवून ती उठली.

“बोला मिस्टर समीर काय काम होतं? ” अनघा समीर समोर उभ्यानेच म्हणाली.

“प्लीज बसा” असं समीरने म्हणताच ती शांतपणे बसली.

“अनघा तू मला खूप आवडतेस, माझ्याशी लग्न करशील? ” समीरने सरळच विचारलं

तो एवढा स्पष्ट बोलेल असं अनघाला वाटलं नव्हतं तिला प्रथम धकाच बसला आणि नंतर तिची तळपायाची आग मस्तकाला जाऊन भिडली. समीरची घाणेरडी नजर तिने ओळखली होती. तो एवढ्या थराला जाईल असं वाटलं नव्हतं. तिने दीर्घ श्वास घेतला आणि बोलायला सुरुवात केली.

“मिस्टर समीर, बरं झालं तुम्हीच विषय काढला ते. मलाही तुमच्याशी या विषयावर बोलायचं होतं. आवडीचं म्हणाला तर मला तुम्ही अजिबातच आवडत नाही. लग्न तर दूरच राहील. साधा मित्र म्हणूनही माझ्या आयुष्यात तुम्हाला स्थान नाही. तुमच्या एकंदरीत वर्तणूकीवरूनच तुमची योग्यता मला समजली आहे. मी तुम्हाला पहिलं आणि शेवटच सांगते माझ्या आयुष्यात ढवळा – ढवळ करण बंद करा. नाहीतर मला साठे मॅडमशी बोलाव लागेल.” अनघा ताडकन उठली.

तिच्या डोळयातून बाहेर पडणाऱ्या अंगाराने समीर जागच्या जागी थिजून गेला. साठे मॅडमच नावं घेतल्यावर तो जास्तच घाबरला. त्यानं मनोमन ठरवलं या पुढे अनघाच्या वाटेला जायचं नाही.

अविनाश ऑफिसला निघाला. भाउंना बरं नसल्याने ते रजेवर होते त्यामुळे तो एकटाच कार घेउन निघाला. तसंही बऱ्याच दिवसात त्याने ड्रायव्हिंग केलं नव्हतं. त्याने रेडीओ ऑन केला आणि गाणी ऐकत तो निघाला. अचानक त्याला अनघाचं वेग कमी करायचं वाक्य आठवलं आणि त्याने आपसूक वेग कमी केला. गंमत म्हणजे पुढच्याच सिग्नलला त्याला अनघा दिसली. आधी त्याला वाटलं आपल्याला भास झाला असेल. पण नीट पाहिलं तर ती अनघाच होती. त्याने गाडी थांबवली आणि जोरातच हाक मारली.

“मिस अनघा तुम्हाला कुठे जायचे आहे का? ” अविनाश अनघासाठी अनपेक्षित होता. तिचा विश्वासच बसेना. ती अचंबित होऊन अविनाशकडे पाहायला लागली. अविनाशला वाटलं हिने आपल्याला चक्क ओळखले सुद्धा नाही. खजील होत तो म्हणाला.

“मी अविनाश कुलकर्णी. ओळखलं नाही का? ”

अनघाला एकदम आपली चूक कळली. पटकन गाडीजवळ येत ती म्हणाली.

“नाही. ओळखल तर तुम्हाला, काय म्हणताहात !”

“तुम्हाला कुठे जायचे आहे? चला मी सोडतो.” अविनाश म्हणाला.

बसावं कि न बसावं असा विचार करत अनघा घोटाळली पण अविनाशने आतून दरवाजाच उघडल्याने तिचा नाईलाज झाला. ती बसली. एकदम अविनाशच्या शेजारी बसल्याने तिला थोडं संकोचल्यासारखं झालं. अविनाशच्या लगेच लक्षात आलं. विषय बदलत तो म्हणाला,” साठे अँड कं या रोडवर नाही आहे. तुम्हाला कुठे जायचे आहे? ”

“मी सावली आश्रमात जात आहे. उषा मॅडमच्या,” अनघाला उषा मॅडम ह्या अविनाशची मावशी आहे हे माहित होतं त्यामुळे पत्ता सांगायची गरज नव्हती.

“ओह! चला तिकडेच सोडतो. त्यानिमित्ताने माझं पण आश्रमात जाणं होईल.” अनघा काहीच बोलली नाही.

तिला बोलतं करण्यासाठी अविनाशने विचारले,” आश्रमात सहजच का? ”

“नाही मुलाचं स्नेहसंमेलन आहे परवा. त्याच्या तयारीसाठी जात आहे. हाफ डे टाकलाय,” अनघा म्हणाली.

“अरे वा छानच,” अविनाशला खुप बरं वाटलं. त्याला खरंतर अनघाविषयी आणखी माहिती हवी होती. पण तिला विचारणं त्याला योग्य वाटेना. तो शांतपणे गाडी चालवू लागला. पण त्याची नजर वारंवार अनघाकडे वळत होती. त्याला स्वतःचाच राग आला. यापूर्वी त्याच्या बाबतीत असं कधी घडल नव्हतं. नेमक रेडिओवर गाण लागल,” पाहिले न मी तुला. . . तू मला न पाहिले. . .”

अनघाला या गाण्यामुळे जास्तच अवघडल्यासारखं झालं. तिने तोंड फिरवल आणि काचेतून बाहेरच दृश्य पाहण्याचा ती प्रयत्न करू लागली. अविनाशालाही अवघडल्यासारखं झालं. सावली येईपर्यंत दोघंही अवघडुन गेली. त्या दोघांना एकत्र बघुन उशादिदिंना बरं वाटलं.

“आज दोघं जोडीने? ” त्या आनंदाने म्हणाल्या. त्यांच्या या वाक्याने अनघाला लाजल्यासारखं झालं. अविनाशने डोळयांच्या कोपऱ्यातून ते पाहिलं आणि त्याची कळी खुलली.

“अग स्नेहसंमेलनाच्या तयारीला या निघाल्या होत्या. माझंपण इकडे काम होतं. म्हणून घेऊन आलो,” अविनाश सावरत म्हणाला.

“बर झालं आलास ते. परवा स्नेहसंमेलन आहे. तेव्हा ताईला आणि भाओजींना घेऊन ये आणि हो तुझ्या मित्रांना पण बोलाव. मी आमंत्रणाला काड्र्स देते,” उषादीदी आग्रहाने म्हणाल्या.

तेवढ्यात बनी धावत आली आणि अनघाला बिलगली. तिथल्या सर्वांचे अनाघावरचे प्रेम पाहून अविनाश भारावून गेला. परवा येण्याचं वचन देऊन आणि अनघाचा निरोप घेऊन तो निघाला.

स्नेहसंमेलनाचा दिवस उजाडला. ‘सावली’ आश्रम नवचैतन्याने उजळला होता. सर्वत्र आनंदी वातावरण होतं. अनघाची सकाळपासून धावपळ चालली होती. फोटोग्राफरला फोन कर, डेकोरेशन, मुलांचे मेकअप, सर्वच्या सर्व जास्तीतजास्त ती करत होती. पळापळ करता यावी म्हणून तिने पंजाबी ड्रेसच पसंत केला होता. गर्द निळा रंग आणि त्यावर मोरपिसांची नक्षी यामुळे आधीच गोरीपान असलेली अनघा अधिकच उठून दिसत होती. कार्यक्रम सुरु व्हायच्या आधीच प्रेक्षकांनी पटांगण भरून गेले होते. अविनाश येणारच होता पण ममताजी आणि माधवराव सुद्धा उपस्थित होते. सुशांत-राधा आणि श्रेयस-आरती जोडीने आले

होते. अनघाच्या ऑफिस मधली सुद्धा आली होती. साठे मॅडमनी वेळात वेळ काढून हजेरी लावली होती. अनघाशी वाद झाल्यावर समीर अमेरिकेला निघुन गेलेला. एकंदरीत सर्व उत्साहाचं वातावरण होतं. उषा दिदींनी जातीने सर्वांचं स्वागत केलं. कार्यक्रमाला सुरवात झाली. सुरवातीलाच मुलांची व्यथा सांगणार नाटक सुरु झालं. अविनाश त्या नाटकात अगदी रमून गेला. तर बऱ्याच बायकांनी डोळ्याला रुमाल लावले. नाटक संपल्यावर सर्वांनी टाळ्यांचा कडकडाट केला. नाटक लिहिण्याऱ्या अंजली गोखलेचं विशेष कौतुक झालं.

नाटक संपल्यावर मग नाच, नकला असे कार्यक्रम झाले. सर्वात शेवटी कोणा मुलाला मनोगत द्यायचं असल्यास मुभा देण्यात आली. तशी पाच-सहा वर्षांची बनी धिटाईने स्टेजवर जाऊन उभी राहिली. एवढ्या मोठ्या जनसमुदायासमोर एवढ्या लहान मुलीला न घाबरता उभं असलेलं पाहून सगळ्यांना कौतुक वाटलं. बनीने बोलायला सुरवात केली." इथे उपस्थित सर्वांना माझा नमस्कार. मला अनघा दीदीचे आभार मानायचे आहेत. आज दिदिमुळे मला आसरा मिळाला. मी आजीबरोबर रस्त्यावर भिक मागायचे . दीदीने मला इथे आणून सोडलं. माझी आजी आता कुठे आहे माहित नाही. अनघा दीदीच मला आजीची माया देते. थँक्यु दीदी."  थोडंसं अडखळत, तुटत बनीनं छान मनोगत दिलं. तीचं बोलण संपल्यावर टाळयांच्या एकच कडकडाट झाला. अनघाने धावत जाऊन बनीला उचलून घेतलं आणि तिचे पटापट मुके घेतले. अविनाशला राहवलं नाही त्याने पटकन पुढे होऊन आपल्या मोबाईल मध्ये फोटो काढले. अविनाशला ओळखणाऱ्यांना त्याच्या या कृत्याने चांगलाच धक्का बसला. सुशांत-श्रेयसने एकमेकांकडे आश्चर्याने पाहिलं. तर ममताजी माधव रावांच्या कानात कुजबुजल्या" यांची जोडी किती छान दिसते. मला तर बाई अनघा सून म्हणून पसंत आहे."  माधव रावांनादेखील आश्चर्य

वाटलं आणि मग त्यांनी हसून मान डोलावली. कार्यक्रमाला आलेल्या सुधीर रावांना आपल्या लेकीच्या कौतुकाने आसमान ठेंगण झालं.

कार्यक्रम संपला, अनघा मुलांना घेऊन आतमध्ये गेली तसे माधवराव सुधीर रावांकडे गेले. सोबत उषादीदी आणि ममताजीही होत्या. उषादिदिनी ओळख करून दिली. हे सुधीर देशपांडे साहेब अनघाचे वडील,"

सुधीररावांनी हात जोडले परंतू त्यांच्या चेहऱ्यावर अनोळखी भाव होते.

" हे माधव कुलकर्णीआणि हि ममता ताई माझी बहिण-भावजी,"

" अच्छा अच्छा, तुम्हाला भेटून आनंद झाला," सुधीर रावांना अजूनही भेटीमागचं कारण न समजल्याने त्यांचा चेहरा गोंधळला होता.

" हे ममता इंडस्ट्रीज चे मालक अनघाने याच कंपनीचं प्रोजेक्ट मिळवलं," उषा दिदींनी आणखी विश्लेषण करून सांगितलं.

ममता इंडस्ट्रीज म्हंटल्यावर सुधीररावांच्या लक्षात आलं. एवढ्या मोठ्या माणसाला आपल्याशी बोलायला आल्याचं आणि आपण साधं त्यांना ओळखलंही नसल्याचं जाणवून ते एकदम खजील झाले.

" माफ करा मी आपल्याला ओळखलं नाही. अनु खूप कौतुक करत असते तुमच. तुम्ही फारच प्रेमळ आणि देवमाणस आहात," हात जोडत सुधीरराव म्हणाले.

" आम्ही इथे आमच कौतुक ऐकायला नाही तर आपल्याला जेवणाच आमंत्रण द्यायला आलो आहोत. रविवारी आमच्याकडे पूजा आहे. तेव्हा नक्की या. अनघाला सोबत घेऊन या."

" हो मी नक्की येईन," सुधीररावांना खूप बरं वाटलं.

घरी आल्यावर सुधीररावांनी अनघाला सांगितलं." अनु अग ते माधव साहेब आणि ममता मॅडम किती चांगले आहेत. एवढी मोठी पण अजिबात गर्व नाही. आपल्याला रविवारी जेवणाच आमंत्रण आहे."

" रविवारी? बाबा तुम्हीच जाल का? माझ्या मैत्रिणीच लग्न आहे." अनघा म्हणाली.

"बरं बरं मी जातो. झोप आता तू फार दमली आहेस. मला तुझा अभिमान वाटतो अनु." सुधीरराव मनापासून म्हणाले.

" बाबा तुम्ही पण ना! तुमचीच मुलगी आहे मी. गुड नाईट," अनघा झोपायला निघून गेली.

-------------*-------------

इकडे अविनाश मात्र अनघाचे फोटो पाहत होता आणि स्वतःच स्वतःशी हसत होता.

दुसऱ्या दिवशी सकाळीच अविनाशला श्रेयसचा फोन आला.” अव्या आम्ही येतोय, ऑफिसला जाऊ नकोस.”

“ अरे बाबा मला महत्वाची काम आहेत,” अविनाश लगबगीने आवरत म्हणाला.

” काम गेली उडत. आम्ही येतोय घरीच रहा,” सुशांत कॉन्फरन्स मधून बोलला.

” बर बाबा लवकर या,” अविनाश नाईलाजाने म्हणाला.

अर्ध्या तासात श्रेयस, सुशांत अविनाशच्या खोलीत पोचले. तेव्हा अविनाश अंघोळीला गेलेला. श्रेयस त्याच्या खोलीतल्या सोफ्यावर बसला तर सुशांत नेहमीप्रमाणे इकडे तिकडे शोधकार्यात गुंतला आणि पाच मिनिटात त्याला अविनाशच्या उशीखाली ठेवलेले अनघाचे वेगवेगळया पोजमधले फोटो सापडले.

” अब आया ऊंट पहाडके निचे,” फोटो श्रेयसला दाखवत सुशांत म्हणाला.

तेवढ्यात अविनाश बाथरूममधून बाहेर आला. त्याने पटकन सुशांतकडून ते फोटो हिसकावून घेतले." सुश्या कसला बालीशपणा हा तुझा? ," अविनाश वैतागून म्हणाला.

" अव्या तू छुपारुस्तम निघालास रे," श्रेयस अश्चार्याने म्हणाला.

" अरे यार तुम्हाला वाटतं तसं काही नाहीये," अविनाश फोटो नीट कपाटात ठेवत म्हणाला.

" मग काय तू फोटोग्राफीचा नवा धंदासुरु केला आहेस का? " सुशांतने विचारले.

" ओके, मला ती आवडते," अविनाशने मान्य केले."

"ये हुईना ना बात हुर्रे. . . ." श्रेयस आणि सुशांतने अत्यानंदाने अविनाशला मिठी मारली.

" रिलॅक्स. . . . तिला याबद्दल काही माहिती नाहीये," अविनाश म्हणाला.

" अरे त्यात काय एवढं आपण सांगू तिला," श्रेयस म्हणाला.

" नको, इतक्यात नको," अविनाश म्हणाला.

" मग काय मुहूर्त काढून सांगायचं का? " सुशांत हसत म्हणाला.

" माहित नाही फक्त आता नको," अविनाश एवढंच म्हणाला. त्याचा चेहरा पाहून सुशांत-श्रेयसला फार वाईट वाटलं. तो असं का म्हणाला असेल हे त्यांना मात्र समजल नाही. खरंतर अविनाशला अनघाची खात्री नव्हती. किंबहुना त्याला स्वतःचीच खात्री नव्हती. हे खरं कि अनघाबद्दल त्याला वेगळ वाटायचं जे आजवर कोणा मुलीबद्दल वाटलं नव्हतं परंतू याला प्रेम म्हणतात का? तो सांशक होता.

-------------*-------------

राधा आणि सुशांत भेटले. भेटले म्हणजे सुशांतने राधाला बोलावून घेतले.

“काय रे एवढं काय झालं? एकदम घाईघाईने बोलावलस? ” राधा काळजीने म्हणाली.

“राधा मला तुझ्याशी खूप महत्वाचे बोलायचे आहे. अविनाशला अनघा आवडते, मला खात्री आहे तो प्रेमात पडलाय,” सुशांत म्हणाला.

“काय सांगतोस काय. परवा स्नेहसम्मेलनाला आलेला तो अविनाश का? मला वाटलंच त्याच्याकडे बघुन. सारखं त्याचं लक्ष अनघाकडेच होतं,” राधा आनंदुन म्हणाली.

“पण तुच मला सांगितलं होतंस ना की अनघाला लग्न करायचं नाही म्हणून,” सुशांतने आठवण करून दिली.

“हो! आपल्याला काहीतरी करायला हवं,” राधा म्हणाली

“त्याआधी अनघाला अविनाशबद्दल काय वाटते ते समजायला हवे. ती काही बोलली आहे का? सुशांतने विचारले.

“नाही. या विषयावर ती नाही बोलली. मी बघते तिच्या मनातले काही बाहेर येते का ते!” राधाने आश्वासन दिले.

------------*------------

रविवार उजाडला. सुधीरराव सकाळपासूनच गडबडीत होते. त्यांना कुलकर्ण्यांकडे जायचं होतं. त्यांनी भरभर आंघोळ केली, पूजा आटोपली. अनघा सकाळीच निघून गेली होती. सुधीरराव माधव कुलकर्ण्यांच्या घरी पोचले. घर कसलं राजवाडाच होता तो. एवढा ऐसपैस आणि अवाढव्य परिसर पाहून सुधीररावना दडपण आलं. ते क्षणभर गेटपाशीच उभे राहिले.

वॉचमनने त्यांना विचारलं तेव्हा त्यांनी माधवरावांना भेटण्याबद्दल सांगितलं. बहुदा वॉचमनला आधिच सांगितलं असाव त्याने लगेच त्यांना आत सोडलं. माधवराव त्यांची वाट पाहत होते. त्यांनी सुधीररावांच मनापासून स्वागत केल. ममताजींनी अनघाची विचारपुस केली.

“ती मैत्रिणीच्या लग्नाला गेली आहे,” सुधीरराव म्हणाले.

तेवढंयात अविनाश बाहेर आला. माधुकररावांनी त्याची ओळख करून दिली. अविनाशने सुधीररावांना वाकून नमस्कार केला. त्याच्याकडे पाहिल्यावर सुधीरारावांच्या मनात आलं, आपल्या अनुसाठी असाच जोडीदार शोधायला हवा.

पूजा झाली जेवण उरकली. ममताजीनी आग्रह करून सुधीरारावांना वाढल. तिथलं वातावरण पाहून सुधीरराव भरून पावले. सर्वजण गप्पा मारायला बसले. तसा माधवरावांनी मनातला विषय काढला,” अनघा खूप गोड मुलगी आहे. आम्हा सर्वांना खूप आवडली आहे. तिच्या लग्नाविषयी तुम्ही काही ठरवलं आहे का? ”

"नाही अहो, म्हणजे विवाह संस्थेत नाव नोंदवेन आता मी," सुधीरराव म्हणाले.

"हरकत नसेल तर एक सुचवायचं होतं. आम्हाला अनघा खुपच आवडली आहे. आमच्या अविनाशसाठी," माधुकररावांनी गौप्यस्फोट केला आणि ममताजींनी हसून संमती दर्शवली.

सुधीररावांना हे अगदीच अनपेक्षित होतं. म्हणजे आपल्या अनुला एखादा राजकुमार मिळावा असं त्यांना नेहमी वाटे. अर्थात प्रत्येक वडिलांना ते तसेच वाटते हे त्यांना माहित होते. पण आपली इच्छा एवढ्या अनपेक्षित रित्या पूर्ण होईल असे त्यांना वाटले नव्हते. त्यांच्या डोळयात आनंदाश्रू उभे राहिले. भावना अनावर झाल्याने त्यांच्या तोंडातून शब्द फुटेना. त्यांना गप्प बसलेलं पाहून माधवराव म्हणाले," काय झालं सुधीरराव तुम्हाला आमचा प्रस्ताव मान्य नाही का? "

"छे छे माधव साहेब अमृताचा अव्हेर कधी कोणी करत का? तुम्ही माणस खूप प्रेमळ आहात. माझी अनु इथे सुखात राहील. फक्त मला एकदा अनुशी बोलायला हवे. तुम्ही चुकीच नका समजु पण तिच्या मताशिवाय आजवर मी कधीच काही केलं नाही. हा तर तिच्या आयुष्याचा प्रश्न आहे," सुधीरराव हात जोडत विनम्रपणे म्हणाले.

"हो तुमच अगदी बरोबर आहे. तुम्ही अनघाशी बोला आणि सावकाश निर्णय कळवा," माधवराव मान डोलवत म्हणाले.

-------------*-------------

सुधीररराव घरी आले तेच आनंदात. कधी एकदा अनघा येते आणि तिच्याशी हे सर्व बोलतो असं त्यांना झालं होतं. दारात गाडी पार्क केल्याचा आवाज आला. अनघा आणि तिच्या मागोमाग राधाला स्कूटीवरून उतरताना सुधीररावांनी खिडकीतून पाहिले. त्यांनी लगेच कॉफीचे आधण ठेवले.

“बाबा सॉरी उशीर झाला. खुपच धम्माल केली आम्ही. कित्ती वर्षांनी सगळ्या भेटलो. लग्नसमारंभ छान पार पडला,” अनघाने घरात येताच आपली बडबड सुरु केली. तिचा चांगला नूर बघुन सुधीररावांना बरं वाटलं. कॉफीचे पेले दोघींच्या हातात ठेवत त्यांनी लग्नाच बोलायचं मनोमन ठरवून टाकल. घसा खाकरून ते म्हणाले,” अनु मला तुझ्याशी महत्वाचे बोलायचे आहे. अशी बस पाहू इथे. राधा तू पण बस तू आमच्या घरातलीच आहेस.”

“काय झालं बाबा एनी प्रॉब्लेम? ” अनघा काळजीने म्हणाली.

“अग नाही ग वेडे. मी खूप आनंदी आहे. आज मी माधवरावांकडे गेलो होतो. विसरलीस का? फारच प्रेमळ माणसे आहेत ती. अविनाशराव खुपच चांगले आहेत,” सुधीररावांनी अविनाशचे नाव घेताच अनघाकडे अपेक्षेने पहिले. तिच्या डोळयासमोर अविनाशची मोहक छबी उभी राहिली. त्यामुळे तिचे गाल आरक्त झाले. हे तिच्या चाणाक्ष पित्याच्या नजरेतून कसे सुटेल! त्यांनी सरळ विषयालाच हात घातला.

“अनु त्यांनी तुला मागणी घातली आहे. असे स्थळ आपल्याला शोधूनही सापडायचे नाही. तुला काय वाटते?

अनघाला अविनाश आवडत होता. त्याच्याही नजरेतून अनेकदा तिला प्रितीचा भास व्हायचा. पण मग त्यांच्यातली सांपत्तिक दरी पाहता तिला ते मृगजळ वाटे. आज हे असे अचानक लग्नाचे तिला खरेच वाटेना. आश्चर्याने ती वडिलांकडे पाहायला लागली तर शेजारी बसलेली राधा पटकन साखर आणायला आत पळाली.

“काय तू  उत्तर नाही दिलेस अनु? ” सुधीरराव प्रेमळपणे म्हणाले. अनघाच्या तोंडून ‘होकार’ जाणार इतक्यात तिच लक्ष आईच्या फोटोकडे गेल. तिच्या डोळयासमोरून एकदम वडिलांचं एकाकीपण गेल. काही महिन्यातच त्यांची रिटायर्डमेंट होती त्यानंतर ते कसे राहणार या कल्पनेने अनघा घायाळ झाली आणि स्वतःच्या स्वार्थी विचारांचा तिला राग आला.

“बाबा काय घाई आहे? मी तुम्हाला का जड झाले? मला अजून पुढे शिकायचे आहे, इतक्यात लग्नाचा विचार नाही.”  अनघा घाईने म्हणाली. तिचे हे वाक्य ऐकून सुधीरराव व आतून साखर आणणारी राधा दोघेही दु:खी झाले. यामागचे खरे कारण माहित असल्याने राधा, तर आपल्याला आपली मुलगी जड झाली हे ऐकून सुधीरराव!

“अनु अग मला तू  का जड होणार आहेस? बाळ तू  अजून शांतपणे विचार कर. कुलकर्णीकडची मंडळी एवढी चांगली आहेत की तुझ्या पुढच्या शिक्षणाला आनंदाने पाठींबा देतील,”  सुधीरारावांनी दुबळा प्रयत्न केला.

“बाबा आता नको हा विषय. मी तुमच्यासाठी खिचडी करते. चल राधा,” असं म्हणून अनघा आत निघून गेली.

“अनु अग हट्ट सोड. अविनाशच घर जवळच आहे. तुझे बाबा एकटे नाही पडणार,” राधा तिला समजावत म्हणाली.

“राधे प्लीज या विषयावर मला बोलायचं नाही. माझा निर्णय झालाय,” अनघा ठामपणे म्हणाली.

“तुला अविनाश आवडतो ना? ” राधाच्या या प्रश्नावर अनघाने तिच्याकडे पाठ केली आणि म्हणाली” नाही!”

-------------*-------------

अविनाश ऑफिस मध्ये बसला होता. त्याला कालचा प्रसंग आठवत होता. नेहमीप्रमाणे अनघाचे फोटो पाहत तो बसला होता आणि त्याची आई कधी खोलीत आली हे त्याला समजले नाही. अनघाच्या विचारात मग्न झालेला तो असा रंगेहात सापडला. अखेर हो नाही म्हणत अनघा त्याला आवडते हे त्याने मान्य केले. त्यानंतर सुधीरराव म्हणजे अनघाचे वडील घरी आल्याचे आणि लग्नाची बोलणी झाल्याचे त्याला कळले. सुधीररावांचे शेवटचे वाक्य त्याला आठवत होते की अनघाचे मत घेऊन ते कळवणार आणि हाच भुंगा त्याच्या डोक्यात भुणभुणत होता.

“काय असेल अनघाचे मत? ” तेवढंयात त्याचा फोन खणखणला. अनघाचा नंबर पाहून त्याला आनंद आणि आश्चर्याचा धक्का बसला.

“हॅलो, मी अनघा बोलतेय. मला तुमच्याशी थोडे महत्वाचे बोलायचे आहे. भेटूया का? ” अनघा.

“हो नक्कीच कुठे भेटायचे? ” अविनाश.

“कॉफीज मध्ये येता का प्लीज!”

“हो मी निघतोय,” अविनाशने फोन ठेवला.

-------------*-------------

अविनाशने कॉफीज जवळ आपली कार पार्क केली आणि तो अनघा कुठे दिसते का ते अधीरपणे पाहू लागला. शेवटी अनघा येई पर्यंत आत वाट पाहत बसायचे ठरवून तो कॉफीज च्या पायऱ्या चढू लागला. वॅाचमनने त्याला कडक सॅल्युट मारला आणि कॉफीजचा मालक अविनाशला पाहून स्वागताला दारात आला.

“या साहेब स्पेशल सूट रेडी केलाय तुमची कार पाहताच,” तो अदबीने म्हणाला.

अविनाशाचे डोळे कोपऱ्यात बसलेल्या अनाघाकडे रोखले गेले.

“नको मी तिकडे बसतो,” तिच्याकडे बोट करत तो म्हणाला आणि मागे न पाहता लांब ढांगात अनाघापाशी पोचला.

“सॉरी मला उशीर झाला,” दिलगिरी व्यक्त करत अविनाश बसला.

“नाही मी इथूनच तुम्हाला फोन लावला होता,” अनघा थंडपणे म्हणाली. तिच्याकडे पाहताच अविनाशला चुकल्यासारखं वाटलं. अनघाचे डोळे लाल दिसत होते. याचा अर्थ ती खूप वेळ रडत असावी. इथे येताना तिने साधी केसांची वेणी घातली होती बाकी अगदीच साधा पंजाबी ड्रेस अंगावर होता. त्याच्याकडे न पाहताच ती म्हणाली,

“इथे आल्याबद्दल धन्यवाद. तुम्ही येणार याची मला खात्री होती. काल बाबा तुमच्याकडे जाऊन आले. तिथे आपल्या लग्नाविषयी बोलणी झाली. तर मला तुम्हाला हे सांगायचे आहे की मला लग्न करायचे नाही. बाबांना हे सर्व सांगणे जड होणार. कृपया तुम्हीच हा निरोप तुमच्या आई बाबांना दया.”

तिच्या चेहऱ्याकडे पाहताच अविनाशला हे उत्तर जाणवले होते. तिच्या स्पष्टपणाचे त्याला कौतुक वाटले. परंतू  त्याचबरोबर तिच्या नकाराचे कारण त्याला जाणून घेणे महत्वाचे वाटले. आयुष्यात पहिल्यांदा त्याला कोणीतरी आवडले होते आणि तिथून नकार येत होता.

“मला नकाराचे कारण समजु शकेलं का? ” अविनाश तिला समजुन घेण्याचा प्रयत्न करत म्हणाला.

अनघाला वाटले होते नकार ऐकताच तो नाराज होईल, तिला कदाचित अद्वातद्वा बोलेल आणि निघून जाईल. पण हा प्रश्न अनपेक्षित होता. तिने विचार केला की जर खरे कारण त्याला सांगितले तर यावर तो तिच्या वडिलांची जबाबदारी घेऊ असं सांगेल. वडिलांना हे समजेल आणि मग नकार देण कठीण होऊन जाईल. थोडा विचार करून ती म्हणाली,

“माझं दुसऱ्या मुलावर प्रेम आहे. बाबांना अजुन सांगितलं नाही. आम्ही लवकरच लग्न करणार आहोत,”  अनघाचा अंदाज अचुक बसला. अविनाश फार दुखावला गेला. त्याला अनेकदा तिच्या डोळयातून प्रिती दिसली होती. का बरं तिने आपली फसवणुक केली? त्याला

खूप राग आला. तिच्या खोटेपणाची सावलीही आता नको असे वाटले. स्वतःवर कमालीचा संयम ठेवत तो म्हणाला,

“ठीक आहे. विश यु ऑल द बेस्ट,” आणि तिथुन निघुन गेला. तो जाताच अनघाने आपल्या अश्रुंना वाट करून दिली आणि यापुढे प्रेमासाठी मनाचे दरवाजे बंद करून टाकले.

-------------*-------------

राधा आणि सुशांत बागेमध्ये बसले होते. राधाने कालची सर्व घटना सुशांतला सांगितली. हा तेढ कसा सोडवायचा याचा तो विचार करत होता.

“मी अविनाशला इथे बोलावून घेतो. हे सर्व त्याला सांगु अनघाची तो नक्कीच समजुत घालेल,” सुशांतने मोबाईल उचलला.” हॅलो अव्या तुला आपल्या नेहमीच्या बागेत येता येईल मला खूप महत्वाचे बोलायचे आहे.

“काय झालं माझा मुड नाहीये प्लीज नंतर बोलू,” अविनाश कॉफीज च्या पायऱ्या उतरत म्हणाला.

“अरे अनघाबद्दल आहे. ये ना प्लीज,” सुशांतने सांगितले. अनघाचं नाव ऐकताच अविनाशची तळपायाची आग मस्तकात गेली.

“हो ते महत्वाचं मला तिच्याकडून समजलं आहे. त्यावर मला चर्वीचर्वण करायचं नाही. मला तिचा नकार मान्य आहे. त्यापेक्षा माझाही आता नकारच आहे,” असं म्हणून त्याने खटकन फोन बंद केला.

सुशांत ते ऐकून सुन्न झाला.

त्याचा पडलेला चेहरा बघुन राधा घाबरून म्हणाली,” काय झालं? ”

“काहीतरी लोचा झालाय. अव्याला काहीतरी चुकीचं कळलंय. तू लगेच अनघाला फोन कर आणि विचार,” अरे पण काय झालं? ” राधा गोंधळून म्हणाली.

यावर सुशांतने तिच्या मोबाईलमधून अनघाचा नंबर काढला आणि डाईल केला,” हॅलो अनु तू  कुठे आहेस? , राधाने नेहमीप्रमाणे विचारले.

एव्हाना अनघा सावरली होती.” मी थोड्या कामासाठी बाहेर आलेले आता घरी जातेय.”

“बर अविनाशशी तुझं काही बोलण झालं का? ” राधाने विचारलं.

“हो अग मी त्यांना नकार कळवला,”  अनघा ठामपणे म्हणाली.

“आणि तू  कारण काय सांगितलं? ” राधाने मुद्द्याला हात घातला.

“मी योग्य तेच सांगितलं. आता यावर जास्त चर्चा नको प्लीज,”  असं म्हणून अनघाने फोन ठेवला.

“तिने काहीच पत्ता लागू दिला नाही,”  राधा म्हणाली.

“आता आपल्यालाच काहीतरी केलं पाहिजे,” सुशांत म्हणाला.

-------------*-------------

अनघा आणि अविनाशने स्वतःला कामात झोकुन दिलं. दोघंही घरात एकदम कमी बोलत. आपलं काम आणि आपण. अनघा राधाला टाळायला लागली. ती जास्तीत जास्त वेळ ऑफिस आणि आश्रमात घालवु लागली. अविनाशने अनघाचे सर्व फोटो ड्रॉवर मध्ये लॉक करून टाकले. एक दिवस सुशांत घरी आला तो साखरपुड्याच आमंत्रण घेऊन. सोबत राधा पण होती. अविनाशने त्यांना येण्याच आश्वासन दिलं. त्यांनी मुद्दामच अनघाचा विषय टाळला. त्यानंतर ते अनघाला तिच्या ऑफिस मध्ये भेटले. अनघा खूप खुष झाली. तिने दोघांना खुप चिडवले आणि मग तिघांनी मिळुन जेवण केले.

-------------*-------------

साखरपुड्याचा दिवस उजाडला. परंपरेप्रमाणे साखरपुडा राधाच्या घरी करायचे ठरले. राधाचे मूळ घर पुण्यात होते. अनघा आणि सुधीरराव आदल्या दिवशी राधाबरोबर जाणार होते. सुशांतने अविनाशला आदल्या दिवशी जायला तयार केले आणि अनघाला निरोप दिला की जाण्यासाठी गाडी ठरलेली असून त्यातूनच तिने यावे. अनघा लगबगीने तयार झाली आपली आणि बाबांची सामानाची बॅग घेऊन टी निघाली. सुधीरराव म्हणाले," अनु मी आपला उद्याच येतो. तुच जा आज."

"का हो बाबा तुमची तब्येत ठीक नाहीये का आज? " अनघाने काळजीने विचारले.

"नाही अग तुम्ही मुलं एन्जॉय करा. मला थोडं काम आहे आज," ते म्हणाले. अनघा नाईलाजाने एकटी गेली. ठरल्याप्रमाणे सर्व राधाच्या घरी जमले.

"चल अनघा आपण त्या गाडीने जाऊ, सुशांत मागे बसला आहे तू पुढे बसशील का?" राधाने विचारले.

"अरे चालेल कबाबमे हड्डी कशाला? " असं म्हणत अनघाने पुढचा दरवाजा उघडला आणि ड्रायव्हिंग बाजूला अविनाशला बघुन चमकली.

"अनु पटकन बस अग, उशीर होतोय," राधा म्हणाली. अविनाशसुद्धा अनघाला बघुन चपापला. अनघाला राधाचा खुप राग आला. तरी ती पुढे अविनाशच्या बाजुला बसली.

अविनाशने कार सुरु केली. त्याच लक्ष बऱ्याचदा अनघाकडे जात होतं हे बघुन सुशांत म्हणाला," अव्या अरे निट लक्ष देऊन ड्रायव्हिंग कर नाहीतर पोचवशील आम्हाला."

त्याच्या या उत्तरावर राधा फिदी फिदी हसली. तर अनघा अविनाश ओशाळले.

राधा सुशांतला म्हणाली," आजचा दिवस खुप छान आहे. आपल्या प्रेमाला आता नामकरण मिळणार. तुला माहितीये काही लोकांना लग्न या प्रकाराची धास्ती वाटते. त्यांना वाटतं लग्नाने नाती दुरावतात."

"अरेच्चा पण नेमकी समस्या काय आहे? " सुशांतने मुद्दाम विचारले.

"अरे माझी एक मैत्रीण आहे. तिने लग्न न करण्याचा निर्णय घेतला आहे. आपल्या निर्णयासाठी तिने प्रेमाची आहुती दिली," राधा म्हणाली. तशी अनघा चपापली. अविनाशला संशय आला.

तो म्हणाला," कसला निर्णय राधा तू कोणाबद्दल बोलते आहेस? "

संभाषणाची गाडी आपल्यावर घसरते आहे असं पाहून अनघाने विषय बदलला. आश्रमातल्या घडामोडी सांगून तिने विषयाला वळसा घातला. पण हे सर्वांच्याच लक्षात आले. गाडी पुण्याला पोचताच अनघा आधी उतरली आणि राधाच्या वाड्यात निघून गेली.

सुशांत राधाच्या कानात कुजबुजला," प्लान ए सक्सेसफुल!"

-------------*-------------

वाड्यात उत्साहाच उधाण आलं होतं. सर्वजण साखरपुड्याच्या तयारीला लागले होते. दुपारची जेवण झाली आणि राधा अनघाला म्हणाली,” चल जरा बागेत जाऊन येऊ. इथे जवळच आहे.” अनघा तयार झाली. तिथे जवळच खळखळ वाहणारा झरा होता. दोघीजणी काठावर बसल्या. कोणीच काही बोलत नव्हतं. शेवटी शांतता भंग करत राधा म्हणाली,

“अनु सकाळी गाडीत तू विषय का बदललास? ”

“राधे तुला महितिए मला या विषयावर बोलायचं नाही आणि प्लीज जे होतंय ते योग्यच आहे.” अनघा म्हणाली.

“तुला अविनाश आवडतो हे तुलाही माहित आहे आणि मलाही,” राधाने तिचा हात हातात घेत सांगितले. यावर अनघा गप्प बसली. राधा तिला हलवत म्हणाली,” प्लीज बोल ना का मनमारते आहेस? त्याच लग्न झालं तर आयुष्यभर अशीच कुढत राहशील.”

अनघा रडायला लागली. इतके दिवस मनात साचलेलं बाहेर आलं. तिने राधाला मिठी मारली आणि म्हणाली,” माझा नाईलाज आहे अग. बाबांना अस्थमा आहे. माझं लग्न झालं तर त्यांचं कसं होणार? कितीही झालं तरी जावई नाहीच जबाबदारी घेत सासऱ्यांची. आधी सगळे हो म्हणतात . मला नाही जमणार. बाबांसाठी मी हे दिव्य करणार.” अनघा ठामपणे म्हणाली.

“पण मग तू अविनाशला हे कारण सांगितलं आहेस का? तू त्याला काय सांगितलंस? ” राधा मूळ मुद्यावर आली.

“मी त्याला सांगितलं कि माझं दुसऱ्या मुलावर प्रेम आहे आणि आम्ही लग्न करणार आहोत.” अनघा आभाळाकडे पाहत म्हणाली.

-------------*-------------

तिचं हे उत्तर एकून राधाला सगळं कोडं सुटलं आणि झाडाच्या मागे राहून ऐकणाऱ्या अविनाशला सुद्धा. सुशांत ने अविनाशला सुद्धा बागेत पाठवले होते. आणि राधा–अनघा बसलेल्या पाहून अविनाश तिथेच थबकला. झाडाचा आडोसा घेऊन त्याने सर्व ऐकले आणि इतके दिवसांची त्याची घालमेल थांबली. तो स्वत:शीच हसला आणि म्हणाला” आता बघतोच एक माणूस किती दिवस अडून बसतं ते. लग्न करेन तर अनघाशीच.” त्याने निर्धार केला आणि तो मागे वळला. त्याच्याकडे डोळयाच्या कोपऱ्यातून पाहणाऱ्या राधाच्या चेहऱ्यावर समाधान पसरले आणि तिने मोबाइल मध्ये मेसेज टाइप केला” प्लान बी सक्सेसफुल.”

-------------*-------------

साखरपुडा निट पार पडला. सर्वजण परत मुंबईला आली. दुसऱ्याच दिवशी अनघाच्या घरातला फोन वाजला.

अनघाने उचलला." हॅलो अनघा स्पिकिंग ."

" हॅलो मी अविनाश बोलतोय. अविनाश कुलकर्णी, '' समोरून दमदार आवाज आला. अनघाला अपेक्षितच नव्हतं. तिच हृदय आपोआप धडधडायला लागल. दीर्घ श्वास घेत तिने स्वत:च्या भावनांवर ताबा मिळवला.

" बोला," एवढंच कसबस ती म्हणाली.

" उद्या तुम्ही घरी आहात का? मला आमंत्रण द्यायला यायचं होतं." अविनाश म्हणाला.

" हो आहोत ना आम्ही. काही कार्यक्रम आहे का? " अनघाने सहज विचारलं.

" हो विशेषच आहे. उद्या सकाळी येतो. बाबांना सांगा. अच्छा!" एवढं बोलून अविनाशने फोन ठेवला.

अनघा विचारात पडली. काय काम असेल, कसलं आमंत्रण असेल. बराच वेळ ती रिसीवर हातातच ठेऊन होती.

" अनु अग कोणाचा फोन होता? '' सुधीररावांच्या हाकेने ती भानावर आली.

“ ते अविनाशजिंचा होता. उद्या येणार आहेत भेटायला,”

“ अरे वा ! काय विशेष म्हणाले” अविनाशच नाव एकताच सुधीररावांचा चेहरा उजळला.

” काही नाही कसलंतरी आमंत्रण देणार आहेत,” एवढं बोलून अनघा स्वयंपाकघरात निघुन गेली. पण तिच्या डोक्यातून” आमंत्रण” शब्द जाईना. काय असेल त्याच लग्न तर ठरलं नसेल? राहून राहून तिला हेच वाटत होतं. रात्रभर तिचा डोळयाला डोळा लागला नाही. अविनाशच्या लग्नाचीदेखील स्वप्न तिला पडली.

अनघाला सकाळी उठायला उशीरच झाला. रात्रभर डोळयाला डोळा नव्हता आणि पहाटे पहाटेच तिला झोप लागली. बाहेर हॉल मध्ये कोणाच्यातरी बोलण्याने तिला जाग आली. तिने घडाळयात पाहिलं तर नऊ वाजले होते. एवढ्या उशिरापर्यंत आपण लोळत कसे पडलो याच तिला आश्चर्य वाटलं. केसांचा अंबाडा घालत ती बाहेर आली. हॉलमध्ये अविनाशला पाहून तिला खूप आश्चर्य वाटलं. साध्या कपड्यातल्या अनघाला पाहून अविनाशला डोळयाचं पारण फिटल्यासारखं वाटलं. हिच्यासाठी तर आलो होतो आपण इथे. हेच आपलं आयुष्य आहे. तो स्व:ताशीच हसला. त्याच्या चेह-यावरच हास्य बघून अनघाला समाधान वाटलं.

” अनु मी तुला आता उठवायलाच येत होतो, बरं झालं उठलीस. मस्त चहा कर बघु.” सुधीरराव म्हणाले.

” हो बाबा आलेच,” अनघा आत जायला वळली.

" नाही चहा वगैरे नको. तुम्ही बसा इथेच. मी आमंत्रण देऊन निघणार आहे," अविनाश अनघाकडे पाहत म्हणाला.

" अरे असं कसं अनु काहीतरी गोड घेऊनच ये. आनंदाची बातमी घेऊन आले आहेत अविनाशराव," सुधीरराव म्हणाले.

"नाही नको बाबा, मी साखरपुड्याच आमंत्रण द्यायला आलोय. सगळं एवढं घाईत ठरलं कि पत्रिकाच छापता आली नाही. येत्या रविवारीच ठेवला आहे म्हणजे सुटीचा प्रश्नच नाही," अविनाश म्हणाला, अनघाच्या पोटात गोळा आला. अविनाशच लग्न ठरलं? तिच्या डोळयात टचकन पाणी आलं. तिथे थांबण तिला जमेनाच.

"मी चहा आणते," एवढं कसबस बोलून ती आत निघुन गेली. तिच्याकडे पाहत असलेल्या अविनाशला खूप आनंद झाला. त्याने सुधीररावांना टाळी दिली.

" बाबा मी येतो, आता हि बाहेर येईल असं वाटत नाही," एवढं बोलून तो उठला आणि सुधीररावांच्या पाया पडला.

" औक्षवंत भव!" सुधीरराव समाधानाने पुटपुटले.

------------*------------

अनघा मनसोक्त रडली. आता आयुष्यात काहीच राहील नाही. फक्त काळाकुट्ट अंधार. आपली घालमेल वडिलांनी समजू नये म्हणून ती निमुट जेवली. अनघाचं लक्षच लागेना. शेवटी गाडी काढून ति जवळच्या मंदिरात आली. तिथल्या शांत वातावरणाने तिच्या मनाची तगमग थांबली. हो आपणच हा मार्ग निवडला आहे. हे होणारच होतं. अविनाशला स्वत:च आयुष्य आहे. बाबा म्हणतात होतं ते चांगल्यासाठीच. तिन्ही सांजेपर्यंत अनघा मंदिरात बसून राहिली आणि मग संध्याकाळची आरती झाल्यावर घरी आली.

रविवार जसजसा जवळ यायला लागला तसतशी अनघाची चलबिचल वाढली. दिवस कापरासारखे उडून गेले. शनिवार उजाडला. विकेंडमुळे अनघाला सुट्टी होती. एरवी सुट्टीचा आठवडाभर आधीच प्लन झालेला असायचा. यावेळी तिच्यातला उत्साहच संपला होता.

“अनु, उद्या कुठे जाऊ नकोस. अविनाशरावांनी अगत्याच आमंत्रण दिलंय. आपल्याला जायलाच हव,” रात्री सुधीरराव जेवणाची पान घेत म्हणाले.

“बाबा मला काही जमणार नाही. तुम्हीच जाऊन या,” उगाचच ताटातला भात चिवडत अनघा म्हणाली.

“अग बरं दिसत नाही. काही काम असली तर मग कर,” सुधीरराव समजुतीच्या स्वरात म्हणाले.

” नाही बाबा प्लीज तुम्हीच जा कार्यक्रमाला,” अनघा उठत म्हणाली.

"अनु अग तू  जेवलीसच नाहीस,"

" भूक नाहीये बाबा,"  अनघाचा कोमेजलेला चेहरा पाहुन त्यांना भरून आले. पण बरं वाटायला कडू औषध घ्यावच लागणार होतं. त्यांनी ताटाला नमस्कार केला आणि तेही पानावरून उठले.

-------------*-------------

अविनाशच्या घरी आनंदाला उधाण आले होते. साखरपुड्याची जय्यत तयारी झाली होती. सुधीरराव आले.

“अनघा कुठे आहे? ” ममताजी म्हणाल्या.” आई ती तशी नाही येणार मलाच जावं लागणार. येतो मी,” अविनाश म्हणाला.

“ब्रेव्हो ये हुईना बात,” श्रेयसने त्याची पाठ थोपटली. इकडे दारावरची बेल वाजली तशी अनघा उठली. तिच्यात उत्साहच नव्हता. तिने दरवाजा उघडला आणि दारात अविनाशला पाहून तिला विश्वासच बसेना. ती आश्चर्याने त्याच्याकडे बघायला लागली. मोती कलरचा सदरा त्यावर केशरी रंगाचे सुंदर नक्षीकाम आणि तसाच पायजमा. डोक्याला तिलक यामुळे आधीच सुंदर दिसणारा अविनाश अधिकच लोभस वाटत होता.

“आत येऊ कि इथूनच बोलू ,” अविनाशने विचारले.

“बाबा गेले आहेत कार्यक्रमाला,” अनघा दारातूनच म्हणाली.” पण मी तुला न्यायला आलोय,” अविनाश दोन पावले पुढे आला त्यामुळे नाईलाजाने अनघाला दारापासून दूर जाव लागल.

“मला नाही जमणार, माझी तब्बेत बरी नाही,” बामची बाटली पुढे करत अनघा म्हणाली.

“साखरपुडा एकट्याने नाही होत, जोडीदाराशिवाय,” अविनाश हसत म्हणाला. म्हणजे तो जोडीदार तू आहेस अनघा, तुझ्याशिवाय मी अपुर्ण आहे,” अविनाश तिचा हात हातात घेत म्हणाला.” मी? पण. . . .” अनघाच्या आश्चर्याला पारावर उरला नाही. तिला क्षणभर सगळं स्वप्नवत वाटलं.” मला तुला काही सांगायचे आहे. बाबा एकटे राहणार म्हणून तू एवढा मोठा निर्णय घेतलास. एकदा मला विश्वासात घ्यायचं ना. अग वेडे बाबांना एकटं कस ठेवेन मी. ते आपल्या बरोबरच राहणार. जसे लग्नानंतर मुलाचे आई-वडील सोबत असतात तसेच मुलीचे. मी तुला वचन देतो बाबांना कधीच अंतर देणार नाही.” अविनाश म्हणाला.

अनघाला गदगदून आलं.” अनु हि साडी नेसशील? मी स्वत: घेतली आहे.” अविनाशच्या कपड्यांना मचिंग कलर साडी होती. अनघाने मानेनेच होकार दिला.

पाच वर्षांनंतर

अनघा आणि अविनाश यांचं थाटात लग्न झालं. त्यांना दोन जुळी मूलं झाली. अविनाशने शब्दाप्रमाणे सुधीररावांना कधीच अंतर दिलं नाही. सर्वजण एकत्र गुण्या गोविंदाने राहतात. अखेर प्रेम जिंकले आणि अशक्य ते शक्य झाले.

“जशी तू  मला तसा मी तुला

तरी आपल्या नात्यात आला अबोला

भावनेचा गुंता सूटता सुटेना

प्रीतीचा मधुगंध भ्रमराला मिळेना

मनाच्या देव्हाऱ्यात पुजली तुझी मूर्ती

आशीर्वाद रूपाने झाली ‘प्रेमपुर्ती’!”

# ई साहित्य प्रतिष्ठान

मराठी पुस्तक वाचायला कुठे जायची गरज नाही. तुमच्या मोबाईलवर आता हजार मराठी ई पुस्तके आहेत.

मराठी ई पुस्तकं तुम्ही www. esahity. com वरून डाऊनलोड करा. किंवा esahity@gmail.com ला कळवून मेल ने मिळवा. किंवा 7710980841 हा नंबर सेव्ह करून या नंबर ला तुमचे नांव व गांव Whatsapp करून पुस्तके whatsapp मार्गे मिळवा. किंवा ई साहित्यचे app.

https://play. google. com/store/apps/details?id=com. esahity. www. esahitybooks

या लिंकवर उपलब्ध आहे. ते download करा. हे सर्व मोफ़त आहे.

No terms. No Conditions.

आता ठरवलंय. मराठी पुस्तकांनी अवघं विश्व व्यापून टाकू. प्रत्येक मराठी सुशिक्षिताच्या मोबाईलमध्ये किमान पन्नास मराठी पुस्तकं असलीच पाहिजेत. प्रत्येक मराठी माणसाच्या!

तुमची साथ असेल तर सहज शक्य आहे हे... कृपया जास्तीत जास्त लोकांना यात सामिल करून घ्या.

आपले नम्र

टीम ई साहित्य